दैनिक
अन्यायाचा प्रतिकार, महाराष्ट्राचा बुलंद आवाज
# रायगड नगरी
मुख्य संपादक : सुनील कृष्णाजी पोतदार
रायगडसह ठाणे, नवी मुंबई, मुंबई, पुणे येथून प्रकाशित
● वर्ष १७ वे ● अंक २४२ ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● शुक्रवार दि.२ डिसेंबर २०२२ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com

## ग्रामपंचायत निवडणुकांसाठी नामनिर्देशनपत्र ऑफलाईन सादर करण्याची मुभा : राज्य निवडणूक आयुक्त

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

विविध जिल्ह्यांतील ग्रामपंचायतींच्या सदस्यपदांसह थेट सरपंचपदाच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी पारंपरिक पद्धतीने (ऑफलाईन) नामनिर्देशनपत्र सादर करण्याची मुभा देण्यात आली आहे. तसेच नामनिर्देशनपत्र सादर करण्याची मुदत २ डिसेंबर २०२२ रोजी सायंकाळी ५.३० पर्यंत वाढविण्यात आली आहे, अशी माहिती राज्य निवडणूक आयुक्त यू.पी. एस. मदान यांनी दिली आहे.

श्री. मदान यांनी सांगितले की, राज्य निवडणूक आयोगाने ९ नोव्हेंबर २०२२ रोजी राज्यातील ७ हजार ७५१ ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांची घोषणा केली होती. त्यानुसार दि.२८ नोव्हेंबर २०२२ ते २ डिसेंबर २०२२ (दुपारी ३ वाजेपर्यंत) या कालावधीत संगणक प्रणालीद्वारे नामनिर्देशनत्र सादर करण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या. त्यात आता अंशत: दुरूस्ती करून नामनिर्देशनपत्र पारंपरिक (ऑफलाईन) पद्धतीने २ डिसेंबर २०२२ रोजी सायंकाळी ५.३० पर्यंत सादर करता येतील.

तरी संबंधितांनी याची नोंद घ्यावी, असे आव–ाहन रायगड जिल्हा प्रशासनातर्फे उपजिल्हाधिकारी (सामान्य प्रशासन) सर्जेराव मस्के–पाटील यांनी केले आहे.

## करंजाडेत महाविकास आघाडीचे शक्ती प्रदर्शन

### सरपंच पदाचे उमेदवार रामेश्वर आंग्रे यांच्यासह सदस्यपदासाठी ११ उमेदवारांनी भरले अर्ज



**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल तालुक्यातील ग्रामपंचायतीचे निवडणुका जाहीर झाल्या आहेत. त्या अनुषंगाने करंजाडे ग्रामपंचायतीचे महाविकास आघाडीचे सरपंच पदाचे उमेदवार रामेश्वर आंग्रे यांच्यासह सदस्यपदासाठी ११ उमेदवारांनी गुरुवारी ता.१ रोजी पनवेल पंचायत समिती कार्यालयात निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे अर्ज भरला. यावेळी महाविकास आघाडीचे जोरदार शक्ती प्रदर्शन करण्यात आले. यावेळी माजी विरोधीपक्षनेते प्रीतम म्हात्रे, माजी नगरसेवक गणेश कडू, रामदास पाटील यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

पनवेल तालुक्यात १८ डिसेंबर २०२२ रोजी १० ग्रामपंचायतच्या निवडणूका होणार असून या ग्रामपंचायतच्या निवडणूका मध्ये निवडणूक लढविण्यासाठी शिवसेना, काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष, शेतकरी कामगार पक्ष असे चार पक्ष एकत्र आले आहेत. या चारही पक्षांनी एकत्र येत पनवेल तालुक्यातील ग्रामपंचायत निवडणूका एकत्रित लढविण्याचा निर्णय घेतला आहे. या चारही पक्षाने महाविकास आघाडी स्थापन करून त्या द्वारे निवडणूक लढविली जात आहे. प्रत्येक गावा–गावात शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी, काँग्रेस (आय), शेतकरी कामगार पक्ष (शेकाप) या पक्षाचे पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या प्रमाणात असून या पदाधिकारी कार्यकर्त्याच्या बळावर व त्यांच्या जनसंपर्कच्या बळावर निवडणूकामध्ये महाविकास आघाडीला बहुमत मिळेल असा विश्वास महाविकास आघाडीतील प्रमुख नेत्यांना आहे. त्यानुसार करंजाडे ग्रामपंचायतीत महाविकास आघाडीचे सरपंच पदाचे उमेदवार रामेश्वर आंग्रे यांच्यासह सदस्यपदासाठी ११ उमेदवारांनी गुरुवारी शक्ती प्रदर्शन करीत पनवेल पंचायत समिती कार्यालयात अर्ज भरण्यात आले.

## गोवर रूबेलाचा मुकाबला करण्यासाठी लसीकरण हा सर्वोत्तम उपाय : आयुक्त गणेश देशमुख

**दै.रायगड नगरी । पनवेल**



गोवर रूबेलाचा फैलाव होऊ नये यासाठी सर्व नागरिकांनी दक्ष राहावे. यापूर्वी आपण कोरोनावर मात केली आहे आता गोवर रुबेलाला पळवून लावू यासाठी घराघरात–परिसरात जनजागृती करा व लस घ्या असे आवाहन पनवेल महानगर पालिकेचे आयुक्त गणेश देशमुख यांनी आज तळोजा येथील नॅशनल उर्दू प्राथमिक, माध्यमिक शाळेत जनजागृती अभियाना अंतर्गत उपस्थित विद्यार्थी शिक्षक व पालक वर्गांना मार्गदर्शक करताना केले.

यावेळी व्यासपीठावर आयुक्त गणेश देशमुख यांच्यासह पनवेल एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष उद्योजक इकबालभाई काझी, याकुब बेग माध्यमिक शाळेचे ट्रस्टी व मा. नगरसेवक मुकीद काझी, मा.नगरसेवक पापा पटेल, मा.नगरसेवक हरेश केणी, महापालिका प्रभारी मुख्य वैद्यकिय अधिकारी डॉ. रेहाना मुजावर, डॉ. पटेल, डॉ.शेख, तळोजा येथील सामाजिक कार्यकर्ते आरिफ पटेल, जवाद पटेल, नाविद पटेल, ताहीर पटेल, मुनाफ सय्यद, उलमा कमिटी सदस्य, शाळेतील शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.

यावेळी बोलताना आयुक्त गणेश देशमुख यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना गोवर लसीकरण केले नाही तर पुढे जाऊन होणारे दुष्परिणाम आणि लसीकरणामुळे होणारे फायदे याची माहिती दिली. त्यासाठी लसीकरण करून घेण्याचे आवाहन केले. तर पनवेल एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष उद्योजक इकबालभाई काझी यांनी सांगितले कि, कोरोनाच्या काळामध्ये तळोजा भागात लसीकरणाचे काम मोठ्या प्रमाणात झाले त्यामुळे या भागात कोरोनाचा ज्यादा फैलाव झाला नाही. आगामी काळात येथील नागरिक गोवर रुबेलासंदर्भात सुद्धा परिसरात जगजागृती करून आपल्या लहान मुलांचे लसीकरण करून घेतील असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. मा.नगरसेवक मुकीद काझी यांनी बोलताना सांगितले कि, व्हॅक्सिन हि चांगली गोष्ट आहे त्याचा फायदा सर्वांनाच होणार आहे. यासाठी सर्वांनी आपल्या मुलांची काळजी घ्यावी व त्यांच्याकडे गोवरची लक्षणे आढळल्यास तातडीने नजीकच्या वैद्यकीय विभागाकडे जाऊन लसीकरण करून घ्यावे. तसेच मा.नगरसेवक हरेश केणी यांनी सुद्धा लक्षणे दिल्यास त्वरित लसीकरण करून घ्या. जसा तळोजाकरांनी कोरोनाला पळवला तसेच गोवरला सुद्धा आपल्याला पळवायचा आहे. यासाठी पनवेल महानगरपालिकेचे आयुक्त गणेश देशमुख हे जनजागृती अभियान मोठ्या प्रमाणात राबवीत आहेत.याबद्दल त्यांचे आभार मानत असल्याचे त्यांनी सांगितले.

## उरण ठरतंय अनधिकृत बांधकामांचे ठिकाण

**दै.रायगड नगरी । उरण**



तालुक्यातील सिडकोसह विविध केंद्र व राज्य सरकारच्या प्रकल्पामुळे येथील नागरिकांनी बांधलेली राहती बांधकामे(घरे)अनधिकृत ठरविण्यात येत आहेत. त्यामुळे उरण हे हजारो अनधिकृत बांधकामे असलेलं ठिकाण बनू लागलं आहे. सिडको, नैना, जेएनपीटी, नौदल सुरक्षा पट्टा आणि आता रेल्वे मुळे उरणच्या रहिवाशांवर नवी संक्रात येऊ घातली आहे. याचा फटका उरण मध्ये राहण्यासाठी जमीन व घरे घेणाऱ्या नागरिकांना बसू लागला आहे. परिणामी आयुष्यभराची कमाई वाया जाण्याची धास्ती नागरिकांकडून व्यक्त केली जाऊ लागली आहे.

उरण तालुक्यात १९६० च्या कालावधीत नौदल आगर सुरू झालं. त्यासाठी येथील शेतकऱ्यांच्या प्रथम जमिनी संपादीत करण्यात आल्या.या मध्ये रेल्वे आणि नौदल हे दोन प्रकल्प आहेत. त्यानंतर १९७० मध्ये नवी मुंबईच्या उभारणीसाठी सिडकोने जवळपास ११ हजार हेक्टर जमीन संपादीत केली. त्यानंतर १९८४ ला जेएनपीटी बंदर प्रकल्प आला. तर २०१० मध्ये नवी मुंबई विमानतळ प्रभावित क्षेत्र(नैना) ची बंधने जाहीर झाली. आणि सध्या सिडको कडून उरण मधील चाणजे, नागाव व केगाव मधील शेतकऱ्याच्या उर्वरीत जमिनी संपादनाची अधिसूचना जाहीर केली आहे. नौदलाने आपल्या बफर झोन साठी नौदल आगाराच्या परिघातील ४५०० बांधकामे(घरे) न्यायालयाने २०११ मध्ये अनधिकृत ठरविली आहेत. (ती वाचविण्यासाठी या अगोदर संरक्षण विभागाकडे मागणी करण्यात आली आहे.)त्यामुळे येथील नागरिकांच्या डोक्यावर अनधिकृत बांधकामाची टांगती तलवार आहे.

तर दुसरीकडे सिडकोने .../२

## उद्धव ठाकरेंसह कुटुंबाच्या अडचणीत वाढ; संपत्तीबाबत ८ डिसेंबरला सुनावणी

**दै.रायगड नगरी । मुंबई**

'माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, त्यांच्या पत्नी रश्मी आणि चिरंजीव आदित्य व तेजस यांनी मोठ्या प्रमाणात बेहिशेबी संपत्ती जमवली असून त्याबाबत सीबीआय व सक्तवसुली संचालनालयामार्फत (ईडी) तपास करण्याचा आदेश द्यावा', अशा विनंतीच्या फौजदारी जनहित याचिकेवर मुंबई उच्च न्यायालयात ८ डिसेंबरला सुनावणी होणार आहे.

दादरमधील गौरी भिडे व त्यांचे वडील अभय भिडे यांनी ही याचिका केली आहे. यापूर्वी मुख्य न्यायमूर्ती दीपांकर दत्ता यांच्या नेतृत्वाखालील खंडपीठाने तांत्रिक कारणामुळे सुनावणीस नकार दिला होता आणि हा विषय अन्य योग्य खंडपीठासमोर सुनावणीस ठेवण्याचे निर्देश रजिस्ट्रीला दिले होते. त्या अनुषंगाने आता न्या. धीरज ठाकूर व न्या. वाल्मिकी मेनेझेस यांच्या खंडपीठासमोर या प्रश्नी सुनावणी होणार असल्याचे निश्चित झाले आहे.

## राज्यातील शासकीय कार्यालयांमध्ये १ एप्रिलपासून 'ई-ऑफिस' प्रणाली सुरू होणार : मुख्यमंत्री

**दै.रायगड नगरी । मुंबई**



प्रशासकीय कामकाज अधिक गतिमान आणि कागदविरहीत (पेपरलेस) होण्यासाठी येत्या १ एप्रिलपासून राज्यभरातील सर्व शासकीय कार्यालयांमध्ये 'ई–ऑफिस' प्रणाली सुरु करण्यात येईल, असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज जाहीर केले. दरम्यान, केंद्राच्या धर्तीवर राज्यात देखील शासकीय कामकाजाच्या फाईल्स निर्णयासाठी चार स्तरापर्यंतच पाठविण्याच्या सूचना मुख्यमंत्र्यांनी प्रशासनाला दिल्या आहेत.

केंद्रीय प्रशासकीय सुधारणा आणि सार्वजनिक तक्रार विभागाचे सचिव श्री. व्ही. श्रीनिवास यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची 'वर्षा' निवासस्थानी भेट घेतली. मुख्य सचिव मनुकुमार श्रीवास्तव, अपर मुख्य सचिव सुजाता सौनिक, यांच्यासह वरिष्ठ अधिकारी यावेळी उपस्थित होते.

प्रारंभी मुख्यमंत्र्यांनी श्री. श्रीनिवास यांचे स्वागत करुन प्रशासकीय सुधारणांच्या क्षेत्रात विविध उपक्रम यशस्वीपणे राबविले जात असल्याबद्दल त्यांचे कौतुक केले. राज्यात सुप्रशासनविषयक मार्गदर्शिका (गुड गव्हर्नन्स मॅन्युअल) तयार करण्यासाठी प्रशासनाला सहकार्य करण्याच्या सूचना देतानाच देशात सुप्रशासन निर्देशांकात द्वितीय क्रमांकावर असलेल्या महाराष्ट्राला प्रथम क्रमांकावर आणण्यासाठी प्रयत्न करण्याच्या सूचनाही मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिल्या.

राज्यातील सर्व शासकीय कार्यालयांमध्ये 'ई–ऑफिस' प्रणालीचा वापर सुरू केल्यास कामकाजाला गती येईल, शिवाय कामकाज संपूर्णपणे कागदविरहीत (पेपरलेस) होणार असल्याने अधिक सुलभता येणार आहे. त्यामुळे येत्या १ एप्रिलपासून राज्याच्या सर्व कार्यालयांमध्ये 'ई–ऑफिस' प्रणाली सुरू करण्याची घोषणा मुख्यमंत्र्यांनी यावेळी केली. सर्व कार्यालये 'ई–ऑफिस' वापरू लागले की मोबाईलवर देखील कामकाजाच्या फाईल्स, कागदपत्रे पाहता येतील, त्याला मान्यता देता येणार आहे.

सध्या मुख्यमंत्र्यांकडे निर्णयासाठी येणारी फाईल ८ विविध स्तरांमधून येते, या अधिकच्या स्तरांमुळे संबंधित विषयांच्या फाईल्सवर निर्णय होण्यास विलंब लागतो, म्हणून गतिमान कारभारासाठी .../२

## पोलीस उपायुक्त यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष पथकाने केलेल्या कारवाईत १६ लाखांचा मुद्देमाल हस्तगत

**दै.रायगड नगरी । पनवेल**

परिमंडळ २ चे पोलीस उपायुक्त पंकज डहाणे यांनी पदभार स्वीकारताच अनधिकृत व बेकायदेशीर रित्या व्यवसाय करणाऱ्यांविरुद्ध धडक कारवाई करण्याचे धोरण अवलंबिले आहे. त्याचाच एक भाग म्हणून कळंबोली स्टील मार्केट परिसरात मोठ्या प्रमाणात रात्रीच्यावेळी उभ्या असलेल्या गॅस टँकर मधून गॅस चोरणारी सराईत टोळी कार्यरत असल्याची माहिती त्यांना मिळताच त्यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष पथकाने कळंबोली स्टील मार्केट परिसरात छापा टाकून १६ लाखा पेक्षा जास्त मुद्देमाल हस्तगत केला आहे.

कळंबोली स्टील मार्केट परिसरात रात्रीच्या वेळेस मोठ्या प्रमाणात उभ्या असणाऱ्या गॅस टँकर मधून गॅसची रिफिलिंगद्वारे चोरी करून तो गॅस कमर्शियल सिलेंडर मध्ये बेकायदेशीररित्या भरण्यात येत असल्याची माहिती पोलीस उपायुक्त पंकज डहाणे याना मिळताच त्यांनी विशेष पथकाद्वारे सदर ठिकाणी छापा मारला असता काही इसम रात्रीच्या अंधारात उभे असलेल्या गॅस टँकर मधून साठवलेला गॅस काढून कमर्शियल सिलेंडर मध्ये भरत असल्याचे दिसून आल्याने तेथील ६ जणांना या पथकाने ताब्यात घेतले

तसेच जवळपास १५० कमर्शियल सिलेंडर व इतर ऐवज तेथे आढळून आल्याने तो सुद्धा ताब्यात घेण्यात आला आहे. अश्या प्रकरणे १६ लाखा पेक्षा जास्त किमतीचा मुद्देमाल सदर ठिकाणाहून ताब्यात घेण्यात आला असून याबाबत पुढील तपास पनवेल तालुका पोलीस करीत आहेत.

## पनवेल ग्रामपंचायत निवडणुकीसाठी शिवसेनेकडून भरण्यात आले उमेदवारी अर्ज

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल तालुक्याच्या १० ग्रामपंचायतीच्या निवडणूक येत्या १८ डिसेंबर रोजी पार पडत असून त्या निवडणुकीसाठी आज शिवसेना (शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे) यांच्या उमेदवारांनी निवडणूक अर्ज पंचायत समिती कार्यालय, पनवेल येथे दाखल केले.

तालुक्यातील नितलस मध्ये ४, करंजाडे २, दिघाटी १, शिरढोण ५, चिंध्रण २, कानपोली २, या ठिकाणी शिवसेनेच्या उमेदवारांनी रायगड जिल्हा शिवसेना संपर्क प्रमुख बबनदादा पाटील व जिल्हा प्रमुख शिरीष घरत यांच्या मार्गदर्शन वं सहकाऱ्याने उमेदवारी अर्ज दाखल केले. यावेळी तालुका प्रमुख विश्वास पेटकर, उपतालुका प्रमुख शांताराम कुंभारकर, महाविकास आघाडीचे मा विरोधीपक्ष नेते प्रीतम म्हात्रे, मा नगरसेवक गणेश कडू, राष्ट्रवादी काँग्रेसचे सुदाम पाटील, काँग्रेस पक्षाचे ए. एस. पाटील, हेमराज म्हात्रे आदींसह पदाधिकारी यावेळी उपस्थित होते प्रचंड उत्साहात व शक्ती प्रदर्शन करीत शिवसेना उमेदवारांनी आज आपले उमेदवारी अर्ज दाखल केले



## स्वच्छ जल से सुरक्षा अभियान यशस्वीपणे राबविणार : डॉ.किरण पाटील

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

शुदध व सुरक्षित पिण्याचे पाणी ,घरोघरी नळ कनेक्शन देण्यासाठी शासनाकडून जल जीवन मिशन अभियान सुरु करण्यात आले आहे. ग्रामपंचायतींमधील सर्व सार्वजनिक संस्थाना शुध्द व स्वच्छ पाणी उपलब्ध करून देणे जलजीवन मिशन अंतर्गत पाणी गुणवत्ता सनियंत्रण व सर्वेक्षण कार्यक्रमांचा उद्देश आहे. ग्रामपंचायत स्तरांवरील पिण्याच्या पाण्याची गुणवत्ता चांगली ठेवणे, ही ग्रामपंचायतींची जबाबदारी आहे. यांतर्गत दि.१ डिसेंबर ते दि.३१ डिसेंबर २०२२ या कालावधीत केंद्र शासनामार्फत सुरु करण्यात आलेल्या जल जीवन सर्वेक्षण २०२३ अंतर्गत स्वच्छ जल से सुरक्षा अभियान जिल्ह्यात राबविले जात असल्याची माहिती जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.किरण पाटील यांनी दिली आहे.

या कालावधीत जिल्ह्यातील सर्व पिण्याच्या पाण्याच्या स्त्रोतांची जैविक व रासायनिक तपासणी करण्यात येणार असून त्याचे अहवाल वेबसाईटवर प्रसिद्ध करण्यात येणार आहेत.तसेच जिल्ह्यातील जलस्त्रोतांचे जिओ टॅगिंग करण्यात येणार आहे. महसूल गावनिहाय पाच महिलांना प्रशिक्षित करण्यात आले असून त्याच्या माध्यमांतून पिण्याच्या पाणी नमुन्यांची जैविक व रासायनिक तपासणी करण्यात येणार आहे.

याकरिता लागणारे जैविक पाणी तपासणी करण्यात येणारे किट ग्रामपंचायतस्तरावर वितरीत करण्यात आले आहेत. जिल्ह्यातील पिण्याच्या पाण्याच्या स्त्रोतांची वर्षातून एक वेळा रासायनिक तपासणी प्रयोगशाळेच्या माध्यमातून करण्यात येत आहे.

या अभियान कालावधीत गावागावातील पाणी नमुन्याची रासायनिक तपासणी रासायनिक फिल्ड टेस्ट किटच्या माध्यमांतून गावातच करण्यात येणार आहे. ग्रामपंचायतीने निवड करण्यात आलेल्या महिलांच्या माध्यमातून पिण्याच्या पाण्याची गुणवत्ता राखणार आहेत. यासाठी तालुकानिहाय प्रशिक्षण देण्याची कार्यवाही सुरु असून या महिलांना रासायनिक पाणी नमुने तप–ासणी किटही देण्यात येणार आहे.या अभियांनातर्गत जिल्हयांतील प्रत्येक नळ पाणी पुरवठा योजनांच्या स्त्रोतांची मान्सून पश्चात कालावधीमधील रासायनिक व जैविक तपासणी करणे, पच्या माध्यमांतून पिण्याच्या पाण्याच्या स्त्रोतांचे जिओ टॅग करणे ,विशेष ग्रामसभेचे आयोजन करून आपले गाव हर घर जल म्हणून घोषित करणे तसेच गावपातळीवर पाणी गुणवत्ताविषयक माहितीबाबत जनजागृतीपर कार्यक्रमांचे आयोजन करून घराघरात पिण्याचे शुध्द व मुबलक पाणी उपलब्ध होईल, यासाठी जिल्ह्यातील प्रत्येक गावाने या अभियानात सहभाग घेऊन अभियान यशस्वी करावे, असे आवाहन मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.किरण पाटील व जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्षाच्या प्रकल्प संचालक तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी शुभांगी नाखले यांनी स्वच्छ जल से सुरक्षा अभियानाच्या शुभारंभप्रसंगी उपस्थित जलसुरक्षक, स्वयंसेवक, अंमलबजावणी सहाय्य संस्था, इतर अधिकारी, कर्मचाऱ्यांना केले.



व्हि .के .हायस्कूल वर्गमित्र ग्रुप आजही एकत्र आहे.

# रोह्यात राज्य अजिंक्यपद खोखो स्पर्धेचे आयोजन

**दै.रायगड नगरी । रोहा**

१२ डिसेंबर रोजी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष व देशाचे नेते शरदचंद्र पवार साहेब हे वयाच्या ८३ व्या वर्षात पदार्पण करीत आहेत. याचेच औचित्य साधत येत्या ८, ९, १० व ११ डिसेंबर रोजी या चार दिवशी खोखो राज्य कुमार गटाच्या स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. असे आ. अनिकेत तटकरे यांनी पत्रकार परीषद घेऊन सांगितले. ३० नोव्हेंबर रोजी सायंकाळी या पत्रकार परिषदेचे आयोजन एम. बी. मोरे फाऊंडेशन धाटाव हायस्कुल मध्ये करण्यात आले होते. यावेळी महाराष्ट्र राज्य खोखो संघटना उपाध्यक्ष विजयराव मोरे, राष्ट्रवादी जिल्हाध्यक्ष मधुकर पाटील, राष्ट्रवादी तालुका अध्यक्ष विनोदभाऊ पाशीलकर, राष्ट्रवादी महिला तालुका अध्यक्षा प्रीतम पाटील, स्नेहा अंकुश ताडकर अलंकार कोठेकर, व खोखो हौशी संघटनांचे पदाधिकारी आणि रोहा तालुक्यातील संघटना प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पंजाब येथे झालेल्या राष्ट्रीय खोखो स्पर्धेत नुकतेच महाराष्ट्र संघाने अंतिम विजेतेपद पटकवल्याने संबंध राज्यात खोखोच्या खेळाचा उत्साह वाढला आहे. एकीकडे शालेय स्पर्धा सुरू असताना आता खोखो राज्य अजिंक्यपद निवड चाचणीला रोह्याचे मैदान झाले आहे. आत्तापर्यंत राज्यातून मुलांचे २४ व मुलींचे २४ संघाची नोंद झाली आहे. एकूण ४८ संघ येथे येतील जवळपास ८२५ खेळाडू येथे आपला खेळ दाखविणार आहेत.या स्पर्धेचा उद्घाटन सोहळा ८ तारखेला सायंकाळी होणार आहे. राज्यभरातून खोखो संघटनेचे ११९ पदाधिकारी उपस्थीत राहणार आहेत. २० पंच असे १२०० लोकांची व्यवस्था करण्यात आली आहे. चार खोखो ची मैदाने आखण्यात आली आहेत. तर

१६ ते १८ वयोगटातील खेळाडू या चाचणीला सामोरे जाणार आहेत. यातूनच राज्याचा संघ तयार करणार असल्याचे सांगण्यात आले. कै.नथुराम भाऊ पाटील यांचे खेळासाठी मोठे योगदान राहिले आहे. रायगड जिल्ह्यातील खेळाला टिकवून ठेवण्याचे काम त्यांनी केले असल्याने नथुरामभाऊ पाटील यांच्या नावाने खोखो क्रीडांगण उपलब्ध करणार असल्याचे आ. अनिकेत तटकरे यांनी सांगितले.

स्पर्धेचे उद्घाटन महाराष्ट्र राज्य खोखो संघटना अध्यक्ष संजीव नाईक निंबाळकर यांच्या हस्ते करण्यात येणार असून राष्ट्रवादीच्या मोठ्या नेत्यांनाही आमंत्रण दिल्याचे सांगितले. खेळाडूंना राहणे, भोजन यांची व्यवस्था करण्यात आली आहे.तसेच रेल्वे स्टेशनवर उतरल्यापासून ने आन करण्याची जबाबदारी खोखो च्या हौशी सदस्यांनी केली आहे. खोखो या खेळाचा प्रसार आणि प्रचार रोहा तालुका व जिल्ह्यांच्या शाळांमध्ये वाढावा म्हणून या राज्यस्तरीय खोखो स्पर्धेचे आयोजन केल्याचेही आ. अनिकेत तटकरे यांनी सांगितले .

रोहा तालुका खेळांच्या तयारीत नेहमीच पुढे आहे, हे खा. सुनील तटकरे यांच्या नियोजनाने नेहमीच दाखवून दिले आहे. २००३ –०४ साली कबड्डीच्या राष्ट्रीय स्पर्धा, राज्याच्या स्पर्धा, कुस्ती स्पर्धा, बॉडी बिल्डिंग स्पर्धा भरविल्याने रोहेकारांसह संबंध रायगड जिल्ह्यातील नागरीक व खेळाडूंना राज्य व राष्ट्रीय खेळ पाहता आला. कबड्डीच्या राष्ट्रीय स्पर्धेमुळे तालुक्यात कबड्डीच्या संघात वाढ झाली. तालुक्यातील निवडक संघ हे जिल्हा व राज्य पातळीवर आपला खेळ खेळत आहेत. शालेय स्पर्धेत खोखो खेळाचा समावेश आहे.त्यामुळे या खेळातही चांगले खेळाडू भविष्यात घडतील. स्पर्धेनिमित्तस्थानिक संस्कृतीक कलाकार यांना प्रोत्साहन देणार असल्याचे आ. अनिकेत तटकरे म्हणाले.

# करंजाडे गावाचे चतु:सीमा ठरवुन सीमांकन करा

**दै.रायगड नगरी । उरण**

सिडको क्षेत्रातील करंजाडे गावाच्या गावठाण विस्तार याचिकेवर मुंबई उच्च न्यायालयाचा महत्वपुर्ण आदेश. राज्य सरकार ने १९७० च्या दशकात सिडको साठी जमीन संपादित केली पण संपादनाचे शिक्के मारताना गावांची सीमा अधोरेखित केलेली नव्हती. गावांची तत्कालीन लोकसंख्या आणि त्यांची भविष्यात होणारी नैसर्गिक वाढ याचा विचार न करता केलेले संपादन महसुल कायद्याला धरून नव्हते. नवी मुंबई सिडको बाधित ९५ गावांचे संपादन करताना नैसर्गिक वाढीचा विचार केला नाही त्यामुळे ग्रामस्थांच्या घरांचा प्रश्न ऐरणीवर आलेला आहे. संपादन करताना केलेल्या चुका आज दुरुस्त करा आणि भुमीपुत्रांना जमीन मालकी द्यावी अशा स्वरूपाची मागणी करंजाडे ग्रामस्थांनी एकत्रितपणे मुंबई उच्च न्यायालयात केली होती. मुंबई उच्च न्यायालयाने ग्रामस्थांची मागणी रास्त ठरवुन राज्य सरकार, जिल्हाधिकारी आणि सिडको ला गावाचे सीमांकन करण्याचे आदेश दिलेले आहेत. उच्च न्यायालयाचा निर्णय म्हणजे करंजाडे ग्रामस्थांच्या एकसंघ पणाला आलेला मोठा यश आहे. सीमांकित गाव नकाशा च्या मंजुरी प्रस्तावासाठी गावठाण विस्तार चळवळीचे नेते तथा उरणचे सुपुत्र राजाराम पाटील आणि अभ्यासक किरण पाटील यांनी मोलाचे मार्गदर्शन केले. तसेच गावाला एकत्रित करून करंजाडे गावाचे सरपंच रामेश्वर आंग्रे, उप सरपंच योगेश कैकाडी, जेष्ठ आणि प्रतिष्ठित नागरिक कर्णा शेलार, कुणाल लोंढे व इतर मान्यवरांनी खुप मेहनत घेतली. सिडको च्या भाटपट्ट्याने घरे नियमित करण्याच्या अमिषाला बळी न पडता जमीन मालकीची मागणी करावी असे आवाहन सामाजिक कार्यकर्ते, गावठाण विस्तार चळवळीचे कार्यकर्ते तथा उरणचे सुपुत्र राजाराम पाटील यांनी नवी मुंबई वासियांना केले आहे.


मा.पांडे सो।
अर्जदारातर्फे वकील ॲड.प्रसाद वाकडीकर

**जाहीर नोटीस**

पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी साहेब यांचे कोर्टात
फौ.चा.अर्ज क्रं.१३३७/२०२२
नि.नं.७/ड
ने.ता.२८/१२/२०२२

श्री.पंकज अरुण पाटील
वय : ४० वर्षे, धंदा : नोकरी
रा.डी–५ अ–१/१, साई अपार्टमेंट को.ऑप.सो.,
सेक्टर ८, खांदा कॉलनी, तालुका : पनवेल,
जिल्हा : रायगड, पिन नं.४१०२०६ अर्जदार
विरुद्ध
मा.निबंधक, जन्म–मृत्यू नोंदणी
विभाग कळंबोली, पनवेल महानगरपालिका
तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड
पिन नं.४१०२०६ सामनेवाला

ज्याअर्थी सदरचे अर्जदार श्री.पंकज अरुण पाटील हे दि.११/०४/१९८३ रोजी राहत्या घरी म्हणजेच मौजे : आसुडगाव, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड येथे जन्म झाला आहे. परंतु काही कारणास्तव अनावधनाने सदरचे अर्जदार यांचे नावाची जन्माची नोंद जुनी ग्रामपंचायत कळंबोली व पंचायत समिती पनवेल यांचे जन्म मृत्यू नोंदणी रजिस्टर मध्ये करणेचे राहून गेली आहे. सबब सदर अर्जदार यांनी मे.न्यायालयात फौजदारी चौकशी अर्ज जन्माची नोंद करण्याचे आदेश होणे करिता दाखल केलेला आहे.

सबब, सदर अर्जाच्या कामी कोणालाही व्यक्तीगत हरकत घ्यावयाची असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून वर नमूद मे.न्यायालयात एक महिन्याच्या आत हजर राहून आपल्या हरकती सादर करावयाच्या आहेत. वर नमूद कालावधी संपण्याच्या अगोदर योग्य त्या हरकती घेतल्या नाहीत. तर मे.न्यायालयाकडून सदरचा अर्ज निकाली काढण्यात येईल.

सदरची नोटीस आज दि.०१/१२/२०२२ रोजी आमच्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/– क.लिपीक फौ.न्याया., पनवेल | कोर्टाचा शिक्का | सही/– सहा.अधिक्षक फौ.न्याया., पनवेल



मा.ए.एस.सोनवलकर, ४ थे न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग–१ पनवेल
प्रो.जमा रु.५०/– अर्जदारतर्फे ॲड.रुपेश एस. पवार

**जाहीर नोटीस**

पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी सो।.रायगड यांचे न्यायालयात
क्रि.चौ.अर्ज क्र.१३०६/२०२२
नि.नं.७/क

श्री.बाळाराम नामदेव पाटील अर्जदार
विरुद्ध
ग्रुपग्रामपंचायत वारदोली सामनेवाला

या जाहीर नोटीशीने तमाम जनतेस कळविण्यात येते की, अर्जदार वरील पत्यावर राहत असून त्याचा जन्म दि.०५/०८/१९८१ रोजी मौजे : वारदोली, पो.चिखले, ता.पनवेल, जि.रायगड येथे झाला आहे. परंतु अर्जदाराचे जन्माची नोंद ग्रुप ग्रामपंचायत वारदोली, ता.पनवेल यांच्या कार्यालयीन दप्तरी सन १९८१ साली नोंदविण्याचे अनावधानाने व नजरचुकीने राहून गेलेले आहे. परंतु आज रोजी अर्जदार यांना शासकीय / निमशासकीय कामाकरिता अर्जदार यांच्या जन्माच्या दाखल्याची अत्यंत आवश्यकता आहे. त्याकामी अर्जदार याने मे.कोर्टात अर्जदाराचा जन्माचा दाखला मिळणेकामी अर्ज केलेला आहे. सदर अर्जाबाबत कोणाचीही कसलीही हरकत असल्यास त्यांनी दि.४/१/२०२३ रोजी सकाळी ११.०० वाजता मे.कोर्टापुढे सर्व पुराव्यानिशी स्वतः किंवा वकीलांमार्फत हजर राहून आपले म्हणणे मांडावे.

सदरहू मुदतीत जर सदरच्या अर्जास कुणाचीही कसलीही हरकत आली नाही तर मे.कोर्ट अर्जदारांच्या अर्जावर योग्य तो हुकूम करून अर्जदार यांना कायद्याने अर्जदार यांच्या जन्माचा दाखला देणेकामी संबंधित ग्रामपंचायत / नगरपरिषद कार्यालयात आदेश दिला जाईल याची नोंद घ्यावी.

आज दि.०१/१२/२०२२ रोजी मझ्या सहीनिशी व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/– क.लिपीक फौ.न्याया., पनवेल | कोर्टाचा शिक्का | सही/– सहा.अधिक्षक फौ.न्याया., पनवेल



**जाहीर नोटीस**

या जाहीर नोटीसीने तमाम जनतेस कळविण्यात येते की, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेले खालील वर्णनाचे भूखंड श्री.जनार्दन हिरु घरत, श्री.हरिश्चंद्र हिरु घरत व श्री.गजानन हिरु घरत रा.आदई, ता.पनवेल, जि.रायगड ह्या सख्या भावामध्ये खालील वर्णन केलेल्या भूखंडाचे दोन्ही भावांच्या संमतीने श्री.जनार्दन हिरु घरत, श्री.हरिश्चंद्र हिरु घरत यांनी श्री.गजानन हिरु घरत यांना बक्षिस पत्राद्वारे भूखंड कायम स्वरुपी बक्षिस दिले आहे. हे बक्षिस पत्र दुय्यम निबंधक पनवेल यांचे कार्यालयात दि.१२/०२/२०१९, पवल–२, दस्त क्रमांक–१८६४/२०१९ रोजी नोंदणीकृत झाला आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : आसुडगाव, ता.पनवेल, जि.रायगड**

| भूखंड क्र. | सेक्टर क्र. | क्षेत्रफळ |
|---|---|---|
| सी १७ | ०४ | १५०.०० चौ.मी. |

तरी वरील वर्णन केलेल्या मिळकतीसंबंधीच्या व्यवहाराबाबत कोणाही व्यक्ती, इसम, कंपनी यांचा दान, गहाण, तरण, लिन, अगर खरेदी अथवा कोणत्याही प्रकारचा हक्क, अधिकार, हितसंबंध, बोजा व हरकत अगर तक्रार असल्यास त्यांनी, कागदोपत्री पुराव्यानिशी सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसात आम्हाला आमचे खालील पत्यावर समक्ष येवून भेटून त्याबाबत मुळ कागदपत्रानिशी वरील नमूद केलेल्या पत्यावर लेखी हरकत नोंदवून तशी लेखी पोहोच घ्यावी.

उपरोक्त १५ दिवसात जर कोणाकडूनही कोणत्याही प्रकारची तक्रार अगर हरकत खालील पत्यावर न मिळाल्यास आमचे अशिल सदरहू भूखंड पूर्णपणे निर्वेध, निजोखमी आहे असे समजून विकसनाचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर मागाहून कुणाचीही तक्रार चालणार नाही याची नोंद घ्यावी.

कळावे
दि.०१/१२/२०२२

सही/–
**ॲड.सुनिता राम पाटील**
**शॉप नं.२६, सेक्टर–१ ए, प्रभात सेंटर,**
**सीबीडी–बेलापूर, नवी मुंबई–४००६१४**
**९८६७६८८७८८** (SMS Whatsapp Only)


# रोहा प्रेस क्लब तर्फे रोह्यात 3 डिसे. ला रक्तदान शिबिर

**दै.रायगड नगरी । रोहा**

तालुक्यातील पत्रकारांची समाजसेवी संस्था रोहा प्रेस क्लब व कै. जनार्दन मारूती शेडगे मित्रमंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवार दि. ०३ डिसें. रोजी सकाळी १० ते सायं. ५.३० दरम्यान शासकिय विश्रामगह दमखाडी येथे सालाबाद प्रमाणे रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

रोहेकरांनी या सामाजिक उपक्रमास नेहमीप्रमाणे आपले योगदान देउन सहकार्य करावे असे अवाहन संस्थेतर्फे करण्यात आले आहे.

रोहयातील एक दानशुर व्यक्तीमत्व आणि प्रेसफोटोग्राफर कै. जनार्दन शेडगे यांच्या स्मरणार्थ रोहा प्रेस क्लब व कै जनार्दन शेडगे मित्र मंडळाच्याया वतीने दरवर्षी रक्तदान शिबिर आयोजित केले जाते. कै जनार्दन शेडगे यांनी त्यांच्या आयुष्यात रक्तदानाचे महत्व ओळखून सत्तरहुन अधिकवेळा रक्तदान करताना विशेषत: अत्यंत गरजेच्या वेळी रक्तदान करून अनेकांचे प्राण वाचविले होते.

कै. शेडगे यांच्या मत्युपश्चात त्यांचा हा समाजिक जाणिवेचा वारसा चालू ठेवण्याच्या उद्देशाने व त्यांना श्रद्वांजली महणुन त्यांच्या जन्मदिनाचे औचित्य साधुन दरवर्षी त्यांचे मित्र मंडळ व रोहा प्रेस क्लबच्या माध्यमातून गेली २० वर्षे या शिबिराचे आयोजन केले जात आहे.

राज्य रक्तसंक्रमण परिषद महाराष्ट्र राज्य आणी शासकिय रक्तपेढी अलिबाग यांच्या सहयोगातुन संपन्न होत असलेल्या या रक्तदान शिबिरास गेली एकोणीस वर्षे रोहेकरांचा उत्स्फुर्त प्रतिसाद मिळत असल्याची माहीती रोहा प्रेस क्लबचे अध्यक्ष शशिकांत मोरे यांनी दिली आहे.


अर्जदारांतर्फे वकील
ॲड.सुधीर एस. म्हात्रे

**जाहीर नोटीस**

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश (व.स्तर) पनवेल यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्र.६१/२०२२
नि.नं.२९/ड
ने.ता.१९/१२/२०२२

१) श्री.गोपाळ महादू गाताडे व इतर अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही सामनेवाला

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, ज्याअर्थी कै.महादू धोंडू गाताडे ह्या २०/०९/२०२० रोजी मयत पावले आहेत. सदर मयताचे मृत्यूपश्चात त्यांच्या मालकीची सर्व्हे नं.११८/५, क्षेत्र ०–६४–६०, आकार ६–७६, मौजे : कराडे खुर्द, ता.पनवेल, जि.रायड ही जमीन आहे. सदर जमिनीचा हिस्सा अर्जदाराचे नावे होण्याकरिता त्यांनी मयत कै.महादू धोंडू गाताडे यांचे दि.२९/०८/२०१६ रोजीचे मृत्यूपत्र प्रोबेट करून मिळणेकरिता मे.कोर्टात अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जदार यांस त्यांचे मागणीप्रमाणे दि.२९/०८/२०१६ रोजीचे मृत्यूपत्र प्रोबेट अर्जासंदर्भात कुणाचीही हरकत असल्यास अशा इसमांनी त्यांच्या लेखी हरकती जरुर त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदर जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याच्या आत या मे.कोर्टात सादर कराव्यात. विहित मुदतीमध्ये कुणाचीही हरकत न आल्यास या अर्जदारांस त्यांचे विनंतीप्रमाणे वारस दाखला दिला जाईल याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आज दि.२१ माहे नोव्हेंबर सन २०२२ रोजी माझ्या सहीने व या मे.कोर्टाचे शिक्क्यानिशी दिली.

सही/– क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल | कोर्टाचा शिक्का | सही/– सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल



**जाहीर नोटीस**

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिल श्री.कृष्णा अनंत चव्हाण यांनी मौजे : आपटे, ता.पनवेल, जि.रायगड येथील जमीन मालक श्री.अल्लीमुद्दीन मोद्दीयुद्दीन शेख यांच्या मालकीची खालील वर्णन केलेली शेतजमीन मिळकत विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : आपटे, ता.पनवेल, जि.रायगड**

| भूमापन नं. | भूमापन क्रमांकाचा उपविभाग | भूधारणा पद्धती | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रु.पैसे |
|---|---|---|---|---|
| ९२ | ८ | १ | ०–०७–०० | ०.७५ |

उपरोक्त जमीन मिळकत आमचे अशिल यांनी कायमस्वरुपी विकत घेण्याचे ठरविले आहे. तरी वरील वर्णन केलेली मिळकत अथवा तिच्या कोणत्याही एका भागावर यापूर्वी विक्रीचा करार, मक्ता, रस्ता वहिवाट, ताबा, देखभाल, गहाण, ट्रस्ट, इजमेंट, बोजा, मृत्यूपत्र, दान बक्षिस, अखत्यारपत्र, कुळहक्क इ. कोणत्याही हक्क असलेल्या सर्व संबंधितांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत आपल्या लेखी हरकती कागदोपत्रांसहीत व पुराव्यासहीत खाली सही करणार वकील यांचेकडे त्याच्या खाली दिलेल्या पत्यावर पोहोचवावी अथवा रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात. वरील मुदतीत कोणाकडूनही काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध, बोजारहीत असून त्यावर कोणतेही प्रकरचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून माझे अशिल सदर मिळकतीचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे माझ्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहीत धरुन सदरचा व्यवहार पूर्ण केला जाईल याची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

पनवेल
दि.०१/१२/२०२२

सही/–
**ॲड.विशाल दत्ता भोपी**
**फ्लॅट नं.३०३, प्लॉट नं.७, विशेष रेसिडेन्सी बिल्डींग, आकुर्ली,**
**ता.पनवेल, जि.रायगड–४१०२०६**
**मोबा. नं.९०८२०३८९६०**


# पेण येथील भाऊसाहेब नेने महाविद्यालयात पोलीस भरतीबाबत प्रशिक्षण शिबीर संपन्न

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर यांच्या संकल्पनेतून रायगड जिल्हा स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र गरुडझेप मार्फत, पेण येथील भाऊसाहेब नेने महाविद्यालय येथे पोलीस भरतीबाबत प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमामध्ये पेण तहसिलदार श्रीमती स्वप्नाली डोईफोडे व नायब तहसिलदार श्रीमती प्रज्ञा राजमाने यांनी प्रशिक्षणार्थींना पोलीस भरतीच्या अनुषंगाने परीक्षेचे अर्ज ऑनलाईन भरणे, पुस्तकांची उपलब्धता, पोलीस भरती परीक्षेचा अभ्यासक्रम व शारिरीक क्षमता चाचणी याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले.

त्याचप्रमाणे उपस्थित विद्यार्थ्यांना गरुडझेप स्पर्धा परीक्षा उपक्रम आणि गरुडझेप पची माहिती तसेच हे प डाऊनलोड कसे करावे, याबाबतही मार्गदर्शन करण्यात आले.


मा.गुन्नाल सो। यांचे कोर्टात
ॲड.भुषण म्हात्रे

**जाहीर नोटीस**

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे न्यायालयात
दि.चौ.अर्ज क्र.१७३३/२०२२
नि.नं.७/ड
ने.ता.११/०१/२०२३

कै.किरण अनंत कोळी मयतचे वारस
श्रीमती.मंजुळा अनंत कोळी
वय : ६० वर्षे, धंदा : गृहिणी
रा.मु.गव्हाण, ता.पनवेल, जि.रायगड अर्जदार

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे असे कळविण्यात येते की, कै.किरण अनंत कोळी ह्यांचे निधन दि.१३/०४/२०१७ रोजी मु.गव्हाण, ता.पनवेल, जि.रायगड येथे झालेले आहे. श्रीमती.मंजुळा अनंत कोळी ह्यांनी कै.किरण अनंत कोळी यांच्या मालकीची खालील वर्णनाची जमीन मिळकतीचे वारसपत्र मिळण्यासाठी अर्ज केलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : गव्हाण, ता.पनवेल, जिल्हा : रायगड**

| गावाचे नांव | स.नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|
| गव्हाण | ३४ | १८ | ०–०९–० | ०.०० |
| | ३६ | ०१ | ०–०३–५० | ०.०० |
| | ३७ | ०९ | ०–१०–१० | ०.०० |
| | ३७ | १२ | ०–०३–५० | ०.०० |
| | ३८ | ०४ | ०–०६–३ | ०.०० |
| | ३४ | २६ | ०–०५–७ | ०.०० |

वरील संपादीत मिळकतीपोटी १२.५ टक्के योजनेप्रमाणे सिडकोकडून कै.किरण अनंत कोळी यांना मौजे : उलवे, ता.पनवेल, जि.रायगड येथे सेक्टर–१९, भूखंड क्र.२४७, क्षेत्र ३०० चौ.मी. क्षेत्राचा भूखंड वितरित करण्यात येणार आहे. श्रीमती.मंजुळा अनंत कोळी हे कै.किरण अनंत कोळी यांचे कायदेशीर वारस आहेत. ह्या हक्काबद्दल कोणाही व्यक्तीस हरकती घ्यावयाच्या असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एका महिन्याच्या आत ह्या मे.कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून हरकती घ्यावयाच्या आहेत. जर या कालावधीमध्ये योग्य त्या हरकती घेतल्या नाहीत तर हे कोर्ट श्रीमती.मंजुळा अनंत कोळी यांच्या हक्काबद्दल पुरावा घेण्याची ताबडतोब कार्यवाही करेल आणि ते जर कै.किरण अनंत कोळी यांच्या वारस पत्रास हक्कवार आहेत असे सिद्ध झाल्यास त्यांना हे वारसपत्र मंजूर करेल.

आज दि.०१/१२/२०२२ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/– क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल | कोर्टाचा शिक्का | सही/– सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल


पृष्ठ क्र.१ वरुन...

## उरण ठरतंय अनधिकृत बांधकामांचे ठिकाण

१९७० नंतर उरण तालुक्यातील नवघर, पागोटे, धुतूम, जासई, करळ, सोनारी, भेंडखळ, बोकडविरा, पाणजे, फुंडे, डोंगरी, बोकडविरा, चिर्ले, चाणजे, नागाव, म्हातवली ग्रामपंचायत हद्दीत गावठाण विस्तार न दिल्याने शेतकरी व प्रकल्पग्रस्त यांच्या वारसांनी गावा शेजारी गरजे पोटी बांधलेली हजारो घरे ही अनधिकृत ठरली आहेत.

## १ एप्रिलपासून ‘ई–ऑफिस’ प्रणाली सुरू होणार : मुख्यमंत्री

फाईल्स सादर करण्याचे स्तर कमी करण्याच्या सूचना देतानाच फक्त चार स्तरांवरुनच फाईल मुख्यमंत्र्यांच्या मान्यतेसाठी पाठविण्याचे निर्देश मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी यावेळी दिले.

ई–सेवा निर्देशांकात देखील महाराष्ट्राचा प्रथम क्रमांक आणण्यासाठी जास्तीत–जास्त सेवांची संख्या वाढविण्याच्या सूचना मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी दिल्या. सध्या राज्यातील ४५० सेवा ऑनलाईन दिल्या जात आहेत. हे जनतेचे सरकार असून सर्वसामान्यांच्या शासनाकडून असलेल्या अपेक्षापूर्तीसाठी मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांच्याकडे प्राप्त होणाऱ्या सार्वजनिक तक्रारींच्या निवारणासाठी ऑनलाईन यंत्रणा कार्यान्वित करण्यात येईल. या तक्रारींचे डिजिटल ट्रॅकिंग करण्यात येईल, तक्रारींवर विभागांनी केलेल्या कार्यवाहीची माहिती देण्यासाठी एक स्वतंत्र डॅशबोर्ड तयार करण्यात येणार आहे. या सार्वजनिक तक्रारींवर केलेल्या कार्यवाहीचा स्वतः आढावा घेणार असल्याचे मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी यावेळी जाहीर केले.

सध्या महाराष्ट्रात फक्त राज्यस्तरावर सुशासन पद्धतीचे पर्यवेक्षण होते, आता शासनाच्या प्रत्येक विभागांची आणि जिल्ह्यांची गुड गव्हर्नन्स रँकिंग केली जाणार आहे. शासकीय विभाग आणि जिल्ह्यांच्या प्रशासनाद्वारे दिल्या जाणाऱ्या शासकीय सेवांची, सुशासनाची क्रमवारी निश्चित करण्याच्या सूचना मुख्यमंत्र्यांनी दिल्या. या सुशासनाच्या क्रमवारीमुळे विभागांमध्ये आणि जिल्ह्या–जिल्ह्यांमध्ये स्पर्धा निर्माण होईलच, शिवाय जनतेला मिळणाऱ्या सेवांचा दर्जा वाढेल, असेही मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी सांगितले. राज्याच्या प्रशासनात सुरू असलेल्या अभिनव, नाविन्यपूर्ण प्रयोगांच्या यशोगाथांचे संकलन केंद्रीय प्रशासकीय सुधारणा आणि सार्वजनिक तक्रार विभागाच्यावतीने करण्यात येणार आहे. यासाठी राज्यातील विशेष कार्य केलेल्या ५० प्रयोगांची निवड केली जाणार असल्याचे सचिव श्री. श्रीनिवास यांनी सांगितले.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू–२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई–४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल–४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स–२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा–पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## मुरुडच्या वसंतराव नाईक महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजनेतर्फे मतदार जनजागृती -नोंदणी व पोलीस भरतीपूर्व मार्गदर्शन

**दै.रायगड नगरी । कोर्लई**

मुरुडच्या वसंतराव नाईक महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजनेतर्फे मतदार जनजागृती–नोंदणी व पोलीस भरतीपूर्व प्रशिक्षण मार्गदर्शन शिबिर संपन्न झाले.

तहसील कार्यालयाचे निवडणूक नायब तहसीलदार अमित पूरी, पोलिस ठाण्याचे पो. शिपाई – परेश म्हात्रे, सचीन वाणी, प्राचार्य डॉ नगरबावडी, उपप्राचार्य डॉ.विश्वास चव्हाण, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ. एस. एस. भैरगुंडे, प्रा. डॉ. जी.डी. मुनेश्वर, प्रा. डॉ. जे. के. कांबळे, प्रा.डॉ. मधुकर वेदपाठक प्रा. डॉ. एन. एन. बागूल, प्रा. डॉ. सिमा नाहीद यांसह महाविद्यालयीन उपस्थित होते.

सुरुवातीला प्रा.डॉ.एस.एस.भैरगुंडे यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत करण्यात येऊन कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली. यावेळी नायब तहसीलदार अमित पुरी यांनी दि.१ जानेवारी २०२३ रोजी १८ वर्षे पूर्ण झालेल्या युवक–युवतींनी मतदार नोंदणी करण्यात आवाहन करण्यात येऊन मतदार जनजागृती व नोंदणी प्रक्रिया याबाबत सविस्तर माहिती देऊन मार्गदर्शन केले तर पोलिस शिपाई परेश म्हात्रे यांनी पोलिस भरती लेखी परीक्षा संदर्भात शारिरक चाचणी गुणांकन बाबतीत माहिती देऊन पोलीस भरतीसाठी सामान्यज्ञान (जनरल नॉलेज) याविषयी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.डॉ.एम.पी.गायकवाड यांनी तर प्रा.डॉ.जी.डी.मुनेश्वर यांनी आभार मानले.

# खडतर संघर्षाची आव्हाने पेलुन अखेरीस माथेरानमध्ये ई-रिक्षा धावणार

**दै.रायगड नगरी । माथेरान**

मागील दहा वर्षांपासून सुरू असलेल्या ई रिक्षाच्या संघर्षाला पूर्णविराम मिळाला असून आजवर अनेक खडतर आव्हाने पेलून अखेरीस माथेरान मध्ये पर्यावरण पूरक ई रिक्षा डिसेंबर महिन्याच्या पहिल्या आठवड्यात धावण्याच्या आशा पल्लवित झाल्या आहेत. त्यामुळेच आबालवृद्ध पर्यटक, शालेय विद्यार्थी,दिव्यांग, रुग्णांसोबतच स्थानिक नागरिकांनी सुटकेचा निश्वास सोडला आहे.

माथेरानचा शोध सन १८५० मध्ये ठाण्याचे तत्कालीन जिल्हाधिकारी सर ह्युज मॅलेट यांनी लावला होता तेव्हापासून ते आजतागायत याठिकाणी मानवचलीत हातरीक्षा आणि घोडा हीच प्रमुख वाहने उपलब्ध आहेत परंतु धावत्या युगाप्रमाणे इथेही व्यवसायात बदल होणे आवश्यक आहे माथेरान हे प्रदूषण मुक्त पर्यटनस्थळ असल्याने इथे पर्यावरणाचा ऱ्हास होऊ नये यासाठी बॅटरी वर चालणारी ई रिक्षा हाच एकमेव पर्याय सर्वांना उपलब्ध होऊ शकतो ही बाब ओळखून येथील सामाजिक कार्यकर्ते, निवृत्त शिक्षक सुनील शिंदेंनी दहा वर्षांपासून आपल्या परीने, जिद्द आणि चिकाटीच्या जोरावर वेळप्रसंगी पदरमोड करून शासन दरबारी सातत्याने पाठपुरावा केला होता. त्यास संघटनेचे अध्यक्ष शकील पटेल, उपाध्यक्ष प्रकाश सुतार, अनिल नाईकडे , रुपेश गायकवाड,गणपत रांजाणे, संतोष शिंदे यांनी मोलाची साथ दिली. सुनील शिंदेंना हेही माहीत होते की, राज्य सरकारने जरी या रिक्षाला मान्यता दिली तरीसुद्धा इथले काही राजकीय महत्वाकांक्षी लोक पुढील काळात नक्कीच या सुंदर प्रकल्पात खोडा घालून ठरावीक मतांच्या लालसेपोटी होणाऱ्या महत्वपूर्ण कामात अडथळा निर्माण करू शकतात



त्यासाठी हे प्रकरण सुप्रीम कोर्टाच्या माध्यमातून पूर्णत्वास नेले आहे. त्यामुळे ज्यांना कुणालाही या पर्यायी वाहतुकीबद्दल आपले म्हणणे, अथवा आडकाठी आणावयाची असेल त्यांना सुप्रीम कोर्टाचेच दरवाजे ठोठावे लागणार आहेत. याकामी सुप्रीम कोर्टाने सुध्दा इथल्या भौगोलिक परिस्थितीचा आढावा घेऊन येत्या तीन महिन्यांसाठी इथे प्रायोगिक तत्वावर सध्या सात ई–रिक्षा सुरु करणार आहेत. या नवीन बदलाचे जवळपास सर्वसमावेशक सुशिक्षित, अभ्यासू नागरीकांनी स्वागतच केले असून त्यास संमती दर्शवली आहे.शासनाच्या मान्यतेने शालेय विद्यार्थ्यांना पाच रुपये या अत्यंत माफक दरात चार किलोमीटर दुर असलेल्या इंग्रजी माध्यमाच्या शाळेत जायला मिळणार आहे.तर नागरिकांना प्रति प्रवासी ३५ रुपये इतका दर आकारण्यात येणार आहे.

कोणत्याही क्षेत्रात काळानुरूप बदल घडवून आणले नाहीत तर सध्याच्या या धावत्या युगात नवनवीन तंत्रज्ञानाचा उपयोग साध्य करताना यशापासून खूपच पिछेहाट होण्याची शक्यता असते त्यासाठी युगाप्रमाणे स्वतः मध्ये आणि सर्वतोपरी व्यावसायिक दृष्टीने परिवर्तन घडले तरच नव्या क्रांतीच्या दिशेने मार्गक्रमण होत असते यात शंकाच नाही. जग एकविसाव्या शतकात वाटचाल करीत असताना त्यातच खेडोपाडी सुध्दा शहराचे अनुकरण करून आदिवासी वाड्या असोत की अतिदुर्गम भाग असो ही गावे सुध्दा आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात समृद्धीच्या दिशेने जात आहेत.

परंतु माथेरान हेच एकमेव गाव असे आहे की याठिकाणी आजही जुन्या रूढींना आणि परंपरांना जपून इथला स्थानिक नागरिक मागासलेपणाचे जीवन जगत आहेत.एखाद्या खेडेगावात सुध्दा सुंदर रस्ते असल्याने त्याठिकाणी उत्तम प्रकारे वाहतुकीची व्यवस्था निर्माण झाल्याने तिथे विकासाची गंगा वाहत आहे.

# उरण शहरात एड्स विषयक जनजागृती रॅली

**दै.रायगड नगरी । उरण**

१ डिसेंबर २०२२ रोजी जागतिक एड्स दिनाचे औचित्य साधून इंदिरा गांधी ग्रामीण शासकीय रुग्णालय उरण व एन. आय हायस्कूल यांच्या संयुक्त विद्यमाने एच आय व्ही एड्स विषयक उरण शहरात जनजागृती रॅली आयोजित करण्यात आली होती.या रॅली चे उद्घाटन मुख्याध्यापक डी.बी.कोठवदे व ग्रामीण रुग्णालय वैद्यकीय अधिक्षक डॉ.बी. एम. कालेल यांच्या हस्ते करण्यात आले.

या रॅली मध्ये उपमुख्याध्यापक जी. बी. पाटील,एस.एस. पाटील,पर्यवेक्षक व्ही.पी. सागळे ,मेडिकल असोसिएशनचे अध्यक्ष मनोज ठाकूर, एस. एस. जगताप, व्ही. एल. काठे, सारिका घरत आदी मान्यवरांसह शालेय विद्यार्थी, विद्यार्थिनी सहभागी झाल्या होत्या. रॅलीमध्ये एड्स बद्दल वेगवेगळ्या घोषणा देण्यात आल्या. वचन पाळा एड्स टाळा. युवकांनी ठरवायचं आहे एड्सला हरवायचे आहे. मनाचा ब्रेक उत्तम ब्रेक. एड्स झालेल्या वक्तिंचा स्वीकार करू. भेदभाव टाळा अशा घोषणा देण्यात आल्या. जागतिक एड्स दिनाचे महत्त्व व एच.आय.व्ही.एड्स या रोगाविषयी जनजागृती करत महादेव पवार समुपदेशक इंदिरा गांधी शासकीय ग्रामीण रुग्णालय यांनी या रोगविषयी असणारे समज गैरसमज एच आय व्हीं होण्याचे कारणे सांगितली.

# मोटार सायकल अपघातात तरुणाचा मृत्यू

**दै.रायगड नगरी । पनवेल**

जेएनपीटी पनवेल महामार्गावर टी पॉईंटजवळ अज्ञात वाहनाने मोटारसायकलस्वाराला धडक दिली. या अपघातामध्ये अरबाज कुडुम या तरुणाचा मृत्यू झाला आहे. पनवेलमध्ये राहणारा अरबाज कुडुम जेएनपीटीमध्ये खासगी वाहनावर चालक म्हणून काम करत होता. रात्री कामावरून घरी परत येत असताना टी पॉईंट साई ढाब्याजवळ त्याच्या मोटारसायकलला वाहनाने धडक दिली. त्याला उपचारासाठी पनवेल ग्रामीण रुग्णालयात नेण्यात आले. तेथे त्याचा मृत्यू झाला. अपघाताची नोंद पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

# ई-श्रम अंतर्गत असंघटित कामगारानी ऑनलाईन नोंदणी करणे गरजेचे : तहसीलदार

**दै.रायगड नगरी । पनवेल**

केंद्र शासनाच्या ई–श्रम योजनेंअंतर्गत असंघटित कामगारांची जास्तीत जास्त कामगारांची ऑनलाईन नोंदणी केली जावी याकरिता ३० नोव्हेंबर तहसिलदार कार्यालय, पनवेल येथे बैठक घेण्यात आली. ही बैठक विजय तळेकर, तहसिलदार पनवेल, सहाय्यक कामगार आयुक्त शितल कुलकर्णी, गटविकास अधिकारी संजय भोये, तसेच महापालिका प्रभाग अधिकारी यांच्या उपस्थितीत पार पडली.

या बैठकीस केंद्र शासनाने असंघटित कामगारांसाठी सामाजिक सुरक्षितता पुरविण्याच्या उद्देशाने दि. ३१ डिसेंबर २००८ ला असंघटित कामगार सामाजिक सुरक्षा अधिनियम २००८ पारीत केलेला आहे. या अंतर्गत असंघटित कामगारांना सामाजिक सुरक्षितता पुरविण्याच्या उद्देशाने असंघटित कामगारांचा डेटाबेस (छऊ्रथ) तयार करण्याचा निर्णय केंद्र शासनाने घेतलेला आहे. त्यानुसार केंद्र शासनाने २६ ऑगस्ट रोजी असंघटित कामगाराची नोंदणी करण्याकरिता ई–श्रम पोर्टल कार्यान्वीत केले आहे. स्वयं रोजगार, घरेलू कामगार, असंघटित क्षेत्रात वेतनावर काम करणारे कामगार, फळ व भाजीपाला विक्रेते, वृत्तपत्रे विक्रेते, विडी कामगार, शेतमजूर, रिक्षाचालक, मुक्त पत्रकार, फेरीवाले व इतर सुमारे ३०० उद्योग व्यवसायातील कामगार तसेच संघटित क्षेत्रातील इतर कामगार ज्यांना कामगार कायद्याचे संरक्षण नाही असे कामगार नोंदणी करू शकतात. ई–श्रम अंतर्गत सदर नोंदणी पुर्णपणे नि:शुल्क आहे.

ई–श्रम पोर्टलवर नोंदणी करण्याकरिता पात्रता वय १६ ते ५९ वर्ष असून असंघटित क्षेत्रामध्ये काम करणारी कोणतीही व्यक्ती यामध्ये नोंदणी करू शकते. फक्त नोंदणी करणारे कर्मचारी हे कर्मचारी भविष्य निर्वाह निधी आणि कर्मचारी राज्य विमा योजनेचे सभासद नसावेत. सदर नोंदणी केल्यानंतर नोंदित कामगारांना रु. २ लाखाचा अपघाती विमा, व अंशत: अपंगत्व आल्यास रु. १ लाखाचा अपघाती विमा मिळणार आहे. या नोंदणीसाठी आधारकार्ड, बँकेचे पासबुक (राष्ट्रीयकृत बँक अथवा खऋड्ड उवेश असलेली इतर कोणतीही बँक), स्वतःचा भ्रमणध्वनी क्रमांक अथवा कुंटुंबातील अन्य व्यक्तीचा भ्रमणध्वनी क्रमांक, ही कागदपत्रे आवश्यक आहे. तसेच स्वयं–नोंदणीकरीता कामगाराचा भ्रमणध्वनी क्रमांक आधारकार्डशी लिंक असणे आवश्यक आहे. ही नोंदणी अर्जदार स्वतः नागरी सुविधा केंद्रामार्फत करु शकतो. तसेच ई– श्रम पोर्टल णठ्ढ.शीहीरा. र्सीं.ळप या अधिकृत वेबसाईवरती जाऊन नोंदणी करता येऊ शकते. या नोंदणी करीता कोणतेही शुल्क आकारण्यात येत नाही. कामगाराची नोंदणी प्रकिया पुर्ण झाल्यावर कामगारांस नागरी सुविधा केंद्रातील प्रतिनिधीकडून ए–४ आकाराच्या पेपरवर ण–छ कार्ड काढून देण्यात येईल. अधिक माहिसाठी राष्ट्रीय हेल्पलाईन नं.–१४४३४, टोल फ्री नं.–१८००१३७४१५० या क्रमांकावर संपर्क साधावा. तरी जास्तीत जास्त कामगारांनी ई–श्रम योजने अंतर्गत नोंदणी करण्याचे आवाहन करण्यात येत आहे.


## जाहीर नोटीस

सर्व लोकांस ह्या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते आहे की, खालीलप्रमाणे वर्णन केलेली जमीन मिळकत ही मेघनाथ जयराम वारदे, रा.खानाव, पो.मोर्बे, ता.पनवेल यांचे नावे ताबेकब्जात व वहिवाटीत असून सदर जमीन मिळकत त्याच्याकडून आमचे अशिल १) दर्शन वसंत पाटील २) सर्वेश वसंत पाटील रा.आकुर्ली, पो.नवीन पनवेल, ता.पनवेल हे कायमस्वरुपी खरेदीखताने विकत घेण्याच्या विचारात आहेत. सदर जमीन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :–

**शेतजमिनीचे वर्णन**
**मौजे : खानाव, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड**

| गट/भूमापन नं. | हिस्सा नं. | भू–धारणा पद्धती | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पैसे |
|---|---|---|---|---|
| ११२ | १ ब | भोग वर्ग–२ | ०–६२–००<br>०–०३–९० (पो.ख.)<br>एकूण क्षेत्र ०–६५–९० | ८.१२ |
| वरील सातबारातील ०–२०–०० गुंठे जमीन विक्रीचा व्यवहार करीत आहेत. | | | | |

वर नमूद केलेल्या जमीन मिळकतीमध्ये कोणाही व्यक्तीचा अथवा कोणत्याही संस्थेचा गहाण, दान, बक्षिस, खरेदी साठेकरार, मिळकत कुळ हक्क, वहिवाटीचा हक्क, ताबा हक्क, भाडेपट्टा, पोटगी, मृत्यूपत्र, अखत्यारपत्र, बोजा अथवा अन्य कोणत्याही प्रकारच हक्क हितसंबंध दिवाणी दावा महसूलवाद असल्यास त्याच्या लेखी हरकती त्यांचे हरकतीतील नमूद केलेल्या हक्काबाबत प्रथमदर्शनी योग्य त्या पुरेशा कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून चौदा दिवसाच्या आत प्रत्यक्ष येवून अथवा रजिस्टर पोस्टाने पाठवाव्यात. याप्रमाणे हरकत मुदतीत न आल्यास सदर मिळकत निर्वेध आहेत असे समजून आमचे अशिलांवर नमूद केलेले मालक / कब्जेदाराबरोबर ठरलेला कायम खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व वरील मुदतीत नंतर आलेली कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही हे कळावे.

पनवेल
दि.०१/१२/२०२२

सही/–
**ॲड.वर्षा राजेंद्र पाटील**
**गाळा नं.०६, पनवेल–दुंदरे रोड, उसर्ली बु. स्टॉप, पो–मोरबे, ता.पनवेल, जि.रायगड**
**मो.नं.९९२०८१८२०६**



## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येत आहे की, मौजे : पिसार्वे, ता.पनवेल, जि.रायगड येथील खालीलप्रमाणे वर्णन केलेली मिळकत ही १) श्री.राजाराम जोमा पाटील २) सौ.सुरेखा अंकुश पाटील ३) सौ.शोभा लक्ष्मीकांत वारेकर ४) श्री.जगदीश जोमा पाटील यांच्या सामाईक मालकीची, ताबेकब्जातील, वापरातील व वहिवाटीतील एकूण क्षेत्र ०–३७–०० जमीन मिळकत आहे. तसेच एकूण क्षेत्र ०–३७–०० पैकी ०–१८–५० गुंठे जमीन हे आमचे अशिलांनी जमिनीचे सहमालक श्री.जगदीश जोमा पाटील यांच्याकडून त्यांच्या हिश्श्यातील असलेले ०–१८–५० गुंठे जमीन कायमस्वरुपी खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :–

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : पिसार्वे, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड**

| गांव | गट क्रं./हिस्सा नं. | क्षेत्र (हे.आर.चौ.मी.) | आकार |
|---|---|---|---|
| पिसार्वे | ६४/६ | एकूण क्षेत्र ०–३७–००<br>पैकी ०–१८–५० गुंठे | ७.३२ |

तरी वर नमूद केलेल्या जमिनीच्या मिळकतीमध्ये अगर तिच्या कोणत्याही भागावर कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, पोटगी, चार्ज, संपास, भाडेपट्टा, वहिवाट, साठेकरार, लिज, तबदील, ट्रस्ट, मिळकत विकसित करण्याबाबतचा करार, समझोता करार, कुळ हक्क, वारसा या प्रकारचा अगर अन्य कोणत्याही व कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध दिवाणी दावा, महसूली वाद असल्यास संबंधितांनी आपापल्या हरकती तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून एकविस (२१) दिवसाच्या मुदतीत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे अगर नमूद केलेल्या पत्यावर सकृतदर्शनी लेखी पुराव्यासहीत रजि. पोस्टाने पाठवावे.

येणेप्रमाणे कोणाचीही, कोणतीही हरकत अगर तक्रार या नोटीशीत नमूद केलेल्या मुदतीत आली नाही तर सदर मिळकत ही निर्वेध बोजारहीत व खरेदी घेण्यास योग्य आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणाऱ्या तक्रारी अगर हरकती आमचे अशिलांवर कोणत्याही व कसल्याही प्रकारे बंधनकारक राहणार नाहीत व संबंधितांनी आपापल्या तथाकथित हरकती तक्रारी कायमच्या सोडून दिल्या आहेत असे समजण्यात येईल हे सर्व लोकांस कळावे.

तळोजा
दि.०१/१२/२०२२

सही/–
**ॲड.सलमान रशिद पटेल**
**मु.पो.तळोजा–पाचनंद, न्यू भारत राईस मिल जवळ, ता.पनवेल, जि.रायगड–४१०२०८**
**मो.नं.९२२२२२२७१६**



मा.गोडसे साो

ॲड.अस्मिता एन. भुवड

## जाहीर नोटीस

पनवेल येथील दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्र.१६७१/२०२२
नि.नं.७/ड
ने.ता.०७/०१/२०२३

१) श्रीमती.मोनिका अशोक पाटील
वय : ३१ वर्षे, व्यवसाय : गृहिणी
रा.मुक्काम भिंगार, पो.अजिवली, पनवेल, जि.रायगड
२) कुमार नक्ष अशोक पाटील
वय : ७ वर्षे, व्यवसाय : शिक्षण
रा.वरीलप्रमाणे
३) कुमार नयन अशोक पाटील
वय : ७ वर्षे, व्यवसाय : शिक्षण
रा.वरीलप्रमाणे
४) श्रीमती.पार्वती नारायण पाटील
वय : ६५ वर्षे, व्यवसाय : गृहिणी
रा.वरीलप्रमाणे अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही

तमाम जनतेस या जाहीर नोटीसने असे कळविण्यात येते की, कै.अशोक नारायण पाटील हे दि.१६/०४/२०२१ रोजी दांडेकर हॉस्पिटल आणि आयसीयु खारघर येथे पनवेल कोविड साथीमुळे मृत्यू झाला. कै.अशोक नारायण पाटील ह्यांचे मृत्यूनंतर त्यांची आई, पत्नी व मुले हेच त्यांचे कायदेशीर वारस आहेत.

अर्जदार क्र.१ श्रीमती.मोनिका अशोक पाटील मयत कै.अशोक नारायण पाटील ह्यांच्या पत्नी आहेत. अर्जदार क्र.२ कुमार नक्ष अशोक पाटील व अर्जदार क्र.३ कुमार नयन अशोक पाटील हे मयत कुमार नयन अशोक पाटील ह्यांची अज्ञान मुले आहेत. मयत कुमार नयन अशोक पाटील ह्यांना अर्जदार क्र.१ ते ४ ह्यांचे व्यतिरिक्त अन्य कोणतेही कायदेशीर वारस नाहीत.

अर्जदार यांनी सदरील दिवाणी चौकशी अर्ज कै.अशोक नारायण पाटील ह्यांचे कायदेशीर वारस असल्याचे घोषित करून मिळणेकरिता दाखल केला आहे. सदर बाबत कोणालाही हरकत असेल अथवा त्या संदर्भात जर कोणतीही हरकत असल्यास सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत ह्या मे.न्यायालयात व्यक्तीश अथवा वकीलांसोबत हजर होवून हरकती कळवाव्यात.

या जाहीर नोटीसीने असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत योग्य हरकती न घेतल्यास अर्जदार यांच्या लाभांत वारस दाखला प्रदान करण्यात येईल.

ही नोटीस आज रोजी दि.३०/११/२०२२ रोजी माझ्या सहीने व शिक्क्याने दिली.

**सही/– क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल** | **कोर्टाचा शिक्का** | **सही/– सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल**



मा.सोनावणे साो

ॲड.छाया रामदास म्हात्रे

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्र.१७७६/२०२२
नि.नं.७/ड
ने.ता.१४/०१/२०२३

१) श्रीमती.सुरेखा रामा म्हात्रे
वय : ४२ वर्षे, धंदा : गृहिणी
२) कु.अनिकेत रामा म्हात्रे
वय : २४ वर्षे, धंदा : नोकरी
३) कु.अभिषेक रामा म्हात्रे
वय : १९ वर्षे, धंदा : शिक्षण
४) कु.रुचिता रामा म्हात्रे
वय : १७ वर्षे, धंदा : शिक्षण
अज्ञान पालनकर्ती आई
श्रीमती.सुरेखा राम म्हात्रे
सर्व रा.गणपती मंदिर जवळ, से.१४,
मु.पो.कामोठे, ता.पनवेल, जि.रायगड अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही सामनेवाला

ज्याअर्थी अर्जदार नं.१ ते ४ हे कै.रामा महादेव म्हात्रे यांचे वारस आहेत. तसेच अर्जदार नं.१ चे पती व अर्जदार नं.२ ते ४ यांचे वडील कै.रामा महादेव म्हात्रे हे दि.२६/०८/२००९ रोजी मौजे : पॅरामाऊंट रुग्णालय पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड येथे मयत झालेले आहेत. तसेच कै.रामा महादेव म्हात्रे यांची आई कै.वनाबाई महादेव म्हात्रे या दि.३०/०९/२०२० रोजी मौजे : न्यू पल्स हॉस्पिटल, कामोठे, ता.पनवेल, जि.रायगड येथे मयत झाल्या आहेत.

अर्जदार नं.१ ते ४ हेच कै.रामा महादेव म्हात्रे यांचे वारसदार आहेत. तसेच अर्जदार नं.१ ते ४ यांच्याशिवाय कै.रामा महादेव म्हात्रे यांस आणखी कोणीही वारसदार नाहीत.

कै.रामा महादेव म्हात्रे यांचे स्वकष्टार्जित व मालकीची तसेच ताबेकब्जातील तसेच नावे असलेल्या मौजे : कामोठे, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | नोड | मालमत्ता क्र. | जुना मालमत्ता क्र. | क्षेत्रफळ चौ.फूट |
|---|---|---|---|---|
| कामोठे, ता.पनवेल, जि.रायगड | सेक्टर–KM–१४ A (कामोठे) | १०६३ | ११८९ | ४०० |

कै.रामा महादेव म्हात्रे यांचे वर नमूद मिळकतीस अर्जदार हेच वारसदार आहेत असा वारसदाखला मिळण्यासाठी अर्जदार यांनी दि.चौ.अर्ज पनवेल येथील मे.दिवाणी न्या.वरिष्ठ स्तर यांच्या कोर्टात दाखल केलेला आहे.

त्याअर्थी सदर वर नमूद केलेल्या मिळकतीस कै.रामा महादेव म्हात्रे यांचे अर्जदार हेच वारसदार असल्याबाबत अर्जदार यांचे नावाने वारसदाखला देण्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात हजर राहून हरकत कळवावी. वरील मुदतीत हरकत न आल्यास नोटीसीच्या मुदतीनंतर अर्जदार यांचे नावाने वारसदाखला दिला जाईल. मात्र मागाहून कोणाचीही हरकत किंवा तक्रार ग्राह्य धरली जाणार नाही.

आज दि.१/१२/२०२२ रोजी माझ्या सही शिक्यानिशी दिली.

**सही/– क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल** | **कोर्टाचा शिक्का** | **सही/– सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल**



मा.गुन्नाल साहेब

ॲड.निलीमा निलेश नाक्ती

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्र.१६४१/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.०६/०१/२०२३

कै.गोपाळ मल्हार सुळे (मयत)
कै.शोभना गोपाळ सुळे (मयत पत्नी)
कै.मिनाक्षी राजू सुळे (मयत सुन) यांचे वारस
१) श्री.राजू गोपाळ सुळे (मुलगा–१)
वय : ६० वर्षे, धंदा : निवृत्त
(पॅन/आधार क्र.BBXPS9250F/५४०४९६१७४२६२)
२) श्री.संजय गोपाळ सुळे (मुलगा–२)
वय : ५८ वर्षे, धंदा : निवृत्त
(पॅन/आधार क्र.BGAPS8262P/६२२५२७५८०४८६)
वरील १ ते २ रा.साई निवास को.ऑप.हौ.सोसायटी,
प्रभु आळी, जुने प्रांत ऑफिस जवळ, पनवेल,
ता.पनवेल, जि.रायगड–४१०२०६
३) सौ.रश्मी देवदत्त कुंभार (विवाहित मुलगी–१)
वय : ५६ वर्षे, धंदा : गृहिणी
(पॅन/आधार क्र.AZRPK4413H/४८२२६९७५०६७७)
रा.गुरुवाटीका सोसायटी, १०४, ठाणा नाका मागे,
प्रांत ऑफिस जवळ, पनवेल, रायगड–४१०२०६
४) कु.रुतुजा राजू सुळे (नात–१)
वय : २५ वर्षे, धंदा : शिक्षण
(पॅन/आधार क्र.HMSP59436K/४४७४२०८६९७७७)
५) कु.समिधा राजू सुळे (नात–२)
वय : २४ वर्षे, धंदा : वास्तुविशारद
(पॅन/आधार क्र.OBIPS0916J/४६०५११५८८८५५५)
वरील ४ ते ५ रा.साई निवास को.ऑ.हौ.सोसायटी,
प्रभु आळी, जुने प्रांत ऑफिस जवळ, पनवेल,
ता.पनवेल, जि.रायगड–४१०२०६
वरील सर्व क्र.१ ते ५ अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही सामनेवाला

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे असे कळविण्यात येते की, कै.गोपाळ मल्हार सुळे, कै.शोभना गोपाळ सुळे व कै.मिनाक्षी राजू सुळे हे रा.फ्लॅट क्र.१९, तिसरा मजला, साई निवास को.ऑप.हौ. सोसायटी, प्रभु आळी, जुने प्रांत ऑफिस जवळ, पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड–४१०२०६., कै.गोपाळ मल्हार सुळे हे दि.२१ मे २०२० रोजी फ्लॅट क्र.१९, तिसरा मजला, साई निवास अपार्टमेंट, प्रभु आळी, पनवेल येथे आजाराने मृत झाले ओहत व कै.शोभना गोपाळ सुळे या दि.१४ जुलै २०२० रोजी पॅनसिया हॉस्पिटल, नवीन पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड येथे आजाराने मृत झाले असून त्यांना अर्जदार क्र.१ ते ३ हे कायदेशीर वारस आहेत व कै.मिनाक्षी राजू सुळे या दि.१५ फेब्रुवारी २०२१ रोजी ॲस्टर आधार हॉस्पिटल, कोल्हापूर येथे आजाराने मृत झाल्या असून त्यांना अर्जदार क्र.१, ४ व ५ हे कायदेशीर वारस आहेत. अर्जदारांना कै.गोपाळ मल्हार सुळे, कै.शोभना गोपाळ सुळे व कै.मिनाक्षी राजू सुळे यांच्या नावे खालील वर्णनाच्या स्थावर मिळकती आहेत.

सबब खालील मिळकतीसाठी वारस दाखला मिळावा म्हणून अर्जदार क्र.१ ते ५ यांनी मे.कोर्टात अर्ज केलेला आहे.

**परिशिष्ट क्र.''अ''**

मौजे : पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड येथील स्थावर मिळकतीचे वर्णन

| अनु क्र. | मिळकतीचे वर्णन | चटई क्षेत्र |
|---|---|---|
| १ | फ्लॅट क्र.१९, तिसरा मजला, साई निवास को.ऑप हौ.सोसायटी, प्रभु आळी, जुने प्रांत ऑफिस जवळ, पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड–४१०२०६ | ६७७ चौ.फूट (चटई क्षेत्र) |

कै.गोपाळ मल्हार सुळे व कै.शोभना गोपाळ सुळे यांचे मृत्यूपश्चात त्यांस अर्जदार क्र.१ ते ३ हे वारस आहेत व कै.शाोभना गोपाळ सुळे यांचे मृत्यूपश्चात त्यांस अर्जदार क्र.१, ४ व ५ हे कायदेशीर वारस आहेत. सदर वारसांव्यतिरिक्त इतर कोणीही वारसदार नाहीत. सबब, अर्जदार क्र.१ ते ५ हे सदरचा वारसा हक्काबद्दल कोणत्याही व्यक्तीस हरकती घ्यावयाच्या असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांचे आत ह्या मे.न्यायालयात प्रत्यक्ष हजर राहून हरकती घ्यावयाच्या आहेत. जर या कालावधीमध्ये योग्य त्या हरकती घेतल्या नाहीत तर हे मे.कोर्ट अर्जदार यांच्या हक्काबद्दल पुरावा घेण्याची ताबडतोब कार्यवाही करेल आणि जर अर्जदार क्र.१ ते ५ हे कै.गोपाळ मल्हार सुळे, कै.शोभना गोपाळ सुळे व कै.शोभना गोपाळ सुळे यांच्या वारसपत्रास हक्कदार आहेत असे सिद्ध झाल्यास त्यांना हे वारसपत्र मंजूर करेल.

आज दि.३०/११/२०२२ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/– क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल** | **कोर्टाचा शिक्का** | **सही/– सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल**

# संक्षिप्त...

## ॲक्टिव्हा गाडीची चोरी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल रेल्वे स्टेशन परिसरातून मोटार सायकल चोरीस गेल्याची घटना घडली आहे.

विचुंबे येथे राहणारे रोहित कांबळे यांनी रेल्वे स्टेशनजवळ उभी केलेली एमएच ४६ एए ६६८९ ही ॲक्टिव्हा चोरीस गेल्याने याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

## पुगांव येथे श्री योगीराज दत्त जन्मोसत्व व अखंड हरीनाम सोहळा

**दै.रायगड नगरी । गोवे-कोलाड**

श्री सद्गुरू पद्मनाभाचार्यस्वामी यांचे शिष्य संप्रदाय अमृतनाथस्वामी यांच्या कृपाछत्राखाली गुरुवर्य त्रिनयनस्वामी, सदाशिवस्वामी, अंबरधर स्वामी, शिवानंदस्वामी, नरेंद्रस्वामी, नरेंद्रनाथस्वामी यांच्या आशिर्वात्मक प्रेरणेने सांप्रदाय भारती गु, जनार्दनस्वामी (वाडीकर महाराज )सदानंद स्वामी, गोपाळ चव्हाण महार-ाज यांच्या मार्गदर्शनाखाली दत्तमोहोत्सव व अखंड हरिनाम सोहळा मार्गशिर्ष शुद्ध १३ सोमवार दि.५/१२/२०२२ ते गुरुवार दि.८/१२/२०२२ पर्यंत साजरा होणार आहे.

यानिमित्ताने पहाटे प्राप्तस्मरण सुदर्शन स्तोत्र व काकड आरती,सकाळी ७ ते ८ वा.घटस्थापना श्री व सौ.सुषमाताई सुभाष देशमुख, सकाळी ८ वा. ध्वजरोहन, सकाळी ९ वा.विणापूजन, सकाळी ९.३० वा.पंचरत्न गिता ज्ञानेश्वरी ग्रंथाचे पारायण, सा.५ ते ६ वा.प्रवचन,सायंकाळी ६ ते ७ हरिपाठ,७ ते ९ हरिकीर्तन व रात्री ११ नंतर हरिभजन अशा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार आहे.सर्व कार्यक्रम यशस्वीकरण्यासाठी सर्व कार्यकारिणी मंडळ व पुगांव ग्रामस्थ मेहनत घेत आहेत.


### वाचकांना विनम्र सूचना

**दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.**


# जिल्ह्यातील सुशिक्षित बेरोजगार,रोजगाराच्या प्रतिक्षेत असणाऱ्या सर्वांनी योजनेचा लाभ घ्यावा : जिल्हाधिकारी

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

राज्यातील शहरी व ग्रामीण क्षेत्रातील सुशिक्षित युवक, युवतींची वाढती संख्या व उद्योग, व्यवसाय क्षेत्रात राज्यात विविध क्षेत्रात उपलब्ध होत असलेल्या स्वयंरोजगाराच्या व रोजगाराच्या नवीन संधी विचारात घेवून उद्योजकतेला चालना देणारी व सर्जनशिलतेला काळानुरूप वाव देणारी सर्व समावेश मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम ही योजना ऑगस्ट २०१९ मध्ये सुरू करण्यात आली आहे. तसेच दि. ११ नोव्हेंबर २०२२ रोजीच्या शासन निर्णयाद्वारे या योजनेच्या स्वरुपाची व्याप्ती वाढविण्यात आली आहे. तरी जिल्ह्यातील जिल्ह्यातील सुशिक्षित बेरोजगार,रोजगाराच्या प्रतिक्षेत असणाऱ्या सर्वांनी योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर व जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक जी.एस.हरळय्या यांनी केले आहे.

योजनेची ठळक वैशिष्टये :-योजना पूर्णत: ऑनलाईन पध्दतीने राबविण्यात येईल तसेच विहित निर्धारित कालावधीत प्रत्येक टप्प्यावरील कार्यवाही पूर्ण करण्यात येईल. योजना उद्योग विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या मार्गदर्शनाखाली व विकास आयुक्त (उद्योग) यांच्या संनियंत्रणाखाली अंमलबजावणी करण्यात येईल. यासाठी जिल्हा स्तरावर जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा कार्यबल समितीकार्यरत राहील.जिल्हा स्तरावर जिल्हा उद्योग केंद्र व जिल्हा ग्रामोद्योग कार्यालय हे कार्यान्वय यंत्रणा आहेत. राष्ट्रीयकृत बँका तसेच प्रमुख खाजगी बँक व रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक यांच्या सहयोगाने सदर योजना राज्यात राबविण्यात येईल.

योजनेचे स्वरुप :- कृषी व कृषीवर आधारीत उद्योग, उत्पादन उद्योग व सेवा उद्योग प्रकल्प योजनेंतर्गत लाभासाठी पात्र आहेत. सेवा क्षेत्रा-तील प्रकल्पांसाठी रु. २० लाख तसेच उत्पादन क्षेत्रांतील प्रकल्पासाठी रु. ५० लाख गुंतवणुकीचे प्रकल्प पात्र राहतील. राज्य शासनाकडून अनुसूचित जाती/अनुसूचित जमाती/ महिला/ अपंग/ माजी सैनिक/ इतर मागास प्रवर्ग / विमुक्त जाती व भटक्या जमाती / अल्पसंख्याक प्रवर्गासाठी अर्जदारांची स्वगुंतवणूक ५ टक्के व देय अनुदान शहरी भागासाठी २५ टक्के व ग्रामीण भागासाठी ३५ टक्के देय असून बॅक कर्ज शहरी भागासाठी ७० टक्के ग्रामीण भागासाठी ६० टक्के उर्वरीत प्रवर्गासाठी स्वगुंतवणूक १० टक्के तर शहरी भागासाठी १५ टक्के ग्रामीण भागासाठी २५ टक्के अनुदान देय असून उर्वरित प्रवर्गासाठी शहरी भागासाठी ७५ टक्के व ग्रामीण भागासाठी ६५ टक्के बँक कर्ज पुरवठा करण्यात येतो. किमान ३० टक्के महिला लाभार्थी तसेच किमान २० टक्के अनुसूचित जाती /जमाती लाभार्थी असतील.

पात्रता मालकी घटक :-योजनेंतर्गत पात्रता धारण करणारे वैयक्तीक मालकी, भागीदारी,वित्तीय संस्थानी मान्यता दिलेले बचत गट यांच्यासह एकल मालकी कंपनी (जझउ) व मर्यादित दायित्व संस्था (डडझ).

आवश्यक कागदपत्रे :-फोटो, आधार कार्ड, शाळा सोडल्याचा दाखला, जन्म दाखला, अधिवास दाखला, जातीचा दाखला, प्रशिक्षण दाखला,शैक्षणिक कागदपत्रे, प्रोजेक्ट रिपोर्ट, अपंग असल्यास त्या विषयीचा दाखला इ.अर्ज प्रक्रिया ऑनलाईन पध्दतीने https://maha-cmegp.gov.in या संकेत स्थळावर सादर करणे आवश्यक आहे. मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम अंतर्गत सन २०२२-२३ या आर्थिक वर्षात रायगड जिल्हयाकरिता शासनाकडून जिल्हा उद्योग केंद्र व खादी ग्रामोद्योग मंडळ या अंमलबजावणी यंत्रणेकडून ८०० प्रकल्पाचे उद्दिष्ट प्राप्त झालेले असून या वर्षी एकूण १ हजार १९१ प्रकरणे बँकेकडे मंजूरीकरिता पाठविण्यात आली आहेत. बँकेकडे पाठविण्यात आलेल्या प्रकरणांपैकी एकूण १४४ प्रकरणास बँकेने मंजूरी दिलेली आहे. एकूण मंजूर प्रकरणात रु. ७५९.७५ लाख इतकी प्रकल्प किंमत असून त्यामध्ये रु. १७२.७९ लक्ष इतके शासन अनुदान समाविष्ट आहे. या योजनेंतर्गत आतापर्यत एकूण १५७ प्रकल्पाचे रु. ३३१.८४ लक्ष इतके अनुदान प्रत्यक्ष वाटप करण्यात आलेले आहे.

जिल्हयातील सर्व सुशिक्षित बेरोजगार/ रोजगाराच्या प्रतिक्षेत असणाऱ्या सर्वांनी योजनेचा लाभ घ्यावा तसेच अधिक माहितीसाठी महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, रायगड-अलिबाग पत्ता- रायगड बाजार समोर, ठिकरुळ नाका, अलिबाग, ता-अलिबाग, जि.रायगड-४०२२०१ येथे संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक जी.एस.हरळय्या यांनी केले आहे.

## दादर सागरी पोलीस स्टेशनचे 3 हवालदार झाले सहाय्यक पोलीस उप निरीक्षक

**दै.रायगड नगरी । पेण**

रायगड जिल्हा पोलीस दलातील पेण तालुक्यातील दादर सागरी पोलीस स्टेशनमध्ये कार्यरत असलेल्या श्यामकांत पाटील, प्रसाद पाटील व दत्ता साळवी या ३ हवालदारांना बुधवार ३० नोव्हेंबर रोजी सहाय्यक पोलीस उपनिरिक्षक पदावर पदोन्नती देण्यात आली आहे. तर पोलीस नाईक मनीष म्हात्रे यांना हवालदार पदी पदोन्नती देण्यात आली आहे. पोलीस हवालदार असलेला कर्मचारी सहाय्यक पोलीस उपनिरिक्षक म्हणून ओळखला जाणार आहे.

पोलीस दलातील पोलीस शिपाई, पोलीस हवालदार आणि सहाय्यक पोलीस उपनिरिक्षक संवर्गातील पदांना मान्यता दिली आहे. गृह विभागाच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यासाठी पोलीस अधीक्षक रायगड यांनी सुरुवात केली आहे. पोलीस दलात ३० वर्ष सेवा पूर्ण करणाऱ्या दादर सागरी पोलीस स्टेशनचे पोलीस हवालदार श्यामकांत पाटील (१३३१), प्रसाद पाटील (१९०७), दत्ता साळवी (१९००) या तीन हवालदारांना सहाय्यक पोलीस उपनिरिक्षक पदावर पदोन्नती देण्यात आली असून १५ वर्ष सेवा पूर्ण करणारे पोलीस नाईक मनीष म्हात्रे (१२२०) यांना पोलीस हवालदार या पदावर पदोन्नती देण्यात आली आहे. दादर सागरी पोलीस स्टेशनच्या कर्मचाऱ्यांना पदोन्नती मिळाल्याबद्दल सहाय्यक पोलीस निरीक्षक गोविंद पाटील, के.आर.भऊड, चव्हाण, कोकरे, मुंडे, खाडे, सारिका पाटील आदींनी पुष्पगुच्छ, शाल व श्रीफळ देऊन त्यांचा सत्कार करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.



## माथेरानमध्ये हुतात्मा भाई कोतवाल यांची जयंती साजरी

**दै.रायगड नगरी । माथेरान**

माथेरानचे सुपुत्र वीर अण्णासाहेब कोतवाल यांची ११० वी जयंती मोठया उत्साहात साजरी करण्यात आली. नगरपरिषदेच्या प्रशासक सुरेखा भणगे (शिंदे) यांच्या शुभहस्ते सकाळी आठ वाजता हुतात्मा स्मारक येथे हुतात्मा भाई कोतवाल यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आला.

नगरपरिषदेचे शिपाई अर्जुन पारधी यांच्या हस्ते हुतात्मा स्मारकं येथील स्वातंत्र्य सैनिकांच्या नामफलकास पुष्पहार अर्पण, स्वातंत्र्य सैनिकांच्या शिल्पास प्राचार्य शांताराम गव्हाणकर शाळेचे शिक्षक रमेश ढोले आणि नगरपरिषद प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक लक्ष्मण ढेबे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला.

त्यानंतर मुख्याधिकारी सुरेखा भणगे यांच्या हस्ते मशाल प्रज्वलित करून गावातून मशाल फेरी नौरोजी उद्यानापर्यंत काढण्यात आली. हुतात्मा भाई कोतवाल यांच्या निवासस्थानी मेघा कोतवाल यांच्या हस्ते भाई कोतवाल यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण, नौरोजी उद्यानातील हुतात्मा भाई कोतवाल यांच्या अर्ध पुतळ्याला प्रशासक सुरेखा भणगे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण, स्वातंत्र्य सैनिकांच्या स्तंभास कार्यालय अधीक्षक प्रवीण सुर्वे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण, हुतात्मा भाई कोतवाल नगरपरिषदेच्या शाळेतील आवारात सुभेदार कै. विनय धनावडे यांच्या शिल्पास सारिका धनावडे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण, छत्रपती शिवाजी महाराज उद्यानात छत्रपती शिवाजी महाराजांच्या अर्ध पुतळ्याला नगरपरिषदेचे रोखपाल राजेश रांजाणे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी शालेय विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीते गायली.

आजी माजी लोकप्रतिनिधी त्याचबरोबर शाळेचे शिक्षक वृंद, शालेय विद्यार्थी, नागरिक उपस्थित होते.हुतात्मा भाई कोतवाल, गोप-ाळराव शिंदे, भाऊसाहेब राऊत यांनी स्थापन केलेल्या माथेरान नागरी सहकारी पतसंस्थेच्या कार्यालयात संस्थेचे सचिव योगेश जाधव यांनी तीनही प्रतिमेला पुष्पहार अर्पण केला.



## गुन्हे शाखा कक्ष २ पनवेलने केले चार वर्षांपासून फरार असलेला आरोपी गजाआड

**दै.रायगड नगरी । पनवेल**

४० लाखांच्या सोन्याच्या दागिने लुटणाऱ्या टोळीतील फरार आरोपीला तब्बल ४ वर्षांनंतर गजाआड करण्यात गुन्हे शाखा युनिट २ पनवेलच्या पथकाला यश आले आहे. याप्रकरणी मिनू ऊर्फ अलाउद्दीन नेसू मोहम्मद शेख (वय ४०) याला कोपरखैरणे येथून अटक करण्यात आली आहे.

नवी मुंबई आयुक्तालयाच्या हद्दीमध्ये घरफोडी व दरोडा सारखे गुन्हे करणाऱ्या टोळीमधील एक संशयित इसम कोपरखैरणे भागात येणार असल्याची गोपनीय माहिती गुन्हे शाखा कक्ष २ पनवेल चे साहाय्यक पोलीस निरीक्षक एस. एस. गायकवाड यांना प्राप्त झाली होती. सदर प्राप्त झालेल्या गोपनीय माहिती प्रमाणे तीन टाकी चौक, कोपरखैरणे येथे सापळा रचून आरोपी मिनू उर्फ अलाउद्दीन नेसू मोहम्मद शेख (वय ४० वर्षे, रा. कमलाबाई अपार्टमेंट, घर नं.२६५, सेक्टर १९, कोपरखैरणे) यांस ताब्यात घेऊन त्याच्याकडे चौकशी केली असता, त्याने त्याच्या ७ ते ८ साथीदारांसह सोन्याची विक्री करणाऱ्या एका इसमावर सी एस टी रेल्वे स्टेशन येथून पाळत ठेऊन तो इसम नेरुळ रेल्वे स्टेशन येथे उतरून एम टी एन एल ऑफिसच्या रोडवर आला तेव्हा त्याच्या डोक्यात दगड मारून त्याच्याकडील सोन्याचे दागिने अस-लेली बॅग जबरीने घेऊन गेल्याचे सांगितले. आरोपीने सांगितल्याप्रमाणे अभिलेख पहिला असता, नेरुळ पोलीस ठाणे येथे गुन्हा क्र.४३६/२०१९ भा द वि कलम ३९५, ३९४, ३४ दाखल असून त्यामध्ये ४० लाख रुपये किंमतीचे सोन्याचे दागिने दरोडा टाकून चोरी केल्याचे समजले.

सदर गुन्ह्यात एकूण ९ आरोपी निष्पन्न झाले होते त्यापैकी ६ आरोपींना यापूर्वी अटक करण्यात आली असून त्यांच्याकडून १३ लाख रुपये किंमतीचे सोन्याचे दागिने जप्त करण्यात आले होते. सदर गुन्ह्यात यापूर्वी मोहम्मद रियासत नासिर अन्सारी (वय २५ वर्षे रा.मानखुर्द, मुंबई), खुर्शीद मोहम्मद अस्लम शेख, (वय २९ वर्षे), अल्ताफ उर्फ मेहताब अब्बास शेख (वय ३९ वर्ष), अब्दुल सलीम उर्फ सोनू हकीम खान(रा. बैगनवाडी, गोवंडी, मुंबई), शरीफ असलम शेख(वय ३३ वर्षे, शिवाजीनगर, गोवंडी, मुंबई), मलिक उस्मान गणी शेख (वय ३८ वर्षे, रा. रफिक नगर झोपडपट्टी, गोवंडी, मुंबई) यांना अटक करण्यात आले होते. सदरची कामगिरी वपोनि रवींद्र पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि.संदीप गायकवाड, पोउपनि. मानसिंग पाटील, पोहवा सूर्यवंशी, पोहवा सचिन पवार व पोहवा पवार यांच्या पथकाने केली.

## उरण नगरपरिषदेच्या कंत्राटी कामगारांना मिळाला बोनस

### विमा योजनाही लागू करण्याची मुख्याधिकाऱ्यांकडे मागणी



**दै.रायगड नगरी । उरण**

उरण नगरपरिषदेचे मुख्याधिकारी राहुल इंगळे आणि म्युनिसिपल एम्प्लाईज युनियनचे अध्यक्ष ड सुरेश ठाकूर, सरचिटणीस अनिल जाधव, कार्याध्यक्ष संतोष पवार आणि उरण युनिटचे कार्याध्यक्ष मधूकर भोईर यांच्यामध्ये झालेल्या बैठकीत कंत्राटी कामगारांच्या विविध विषयांवर चर्चा झाली. त्यामध्ये प्रामुख्याने कंत्राटी सफाई कामगारांना ठेकेद्नांकडून गेले दोन वर्षांपासून बोनस मिळत नव्हता. तसेच रसिक ईएसआयसी या सरकारी आरोग्य विम्याचे खातेही उघडलेले नव्हते. तसेच भविष्य निर्वाह निधीची नियमाप्रमाणे जेवढी आवश्यक आहे. ती भरावयाची रक्कम भरण्यात आलेली नव्हती. कायम कर्मचाऱ्यांची गेले दोन वर्षे मेडीक्लेम पॉलीसी सुद्धा काढण्यात आलेली नव्हत.

सदर मेडीक्लेम पॉलीसी पूर्ववत सुरू करण्यासंदर्भात कंत्राटी कर्मचाऱ्यांतर्फे मागणी करण्यात आली होती ती सुद्धा मागणी प्रलंबित होती.कामगारांच्या अनेक समस्या प्रलंबित होत्या.या समस्या मुख्याधिकारी राहुल इंगळे यांच्या समोर मांडण्यात आले. नवनिर्वाचित मुख्याधिकारी राहूल इंगळे यांनी कायदेशीर बाजू तपासून सफाईचे अत्यंत महत्त्वाचे काम करणारे कंत्राटी सफाई कामगारांना ठेकादारामार्फत कायदेशीर बोनस देणे बाबत आदेश दिले.

आदेश दिल्याप्रमाणे भाग्यदिप वेस्ट मॅनेजमेंट प्रा. लि. या ठेकेदारामार्फत रक्कम रू. ५३०० /-- रूपये पहिल्यांदा बोनस मिळाल्या बद्दल मुख्याधिकारी राहूल इंगळे यांचे पुष्पगुच्छ देऊन म्युनिसिपल एम्प्लॉईज युनियनचे पदाधिकारी व कंत्राटी कर्मचाऱ्यांनी आभार मानले.त्याच प्रमाणे किमान वेतन, नियमाप्रमाणे भविष्य निर्वाह निधी आणि ईएसआयसी वीमा योजना या उर्वरित प्रश्नांची सोडवणूक करून न्याय द्यावा अशी मागणी म्युनिसिपल एम्प्लॉईज युनियनचे पदाधिकारी व कंत्राटी कर्मचाऱ्यांनी मुख्याधिकारी राहुल इंगळे यांच्याकडे केली आहे.

## पगाराचे पैसे मागितल्याचा रागातून कामगारावर हल्ला

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पगाराचे राहिलेले पैसे मागितल्याच्या रागातून दुकान मालक आणि त्याच्या सहकार्याने कामगारावर हल्ला केल्याची घटना कळंबोली वसाहतीत घडली आहे. शिवीगाळ करत करण्यात आलेल्या हल्ल्यात कामगार गंभीर जखमी झाला असून, त्याच्यावर कामोठे येथील एमजीएम रुग्णालयात उपचार सुरु आहेत.

छोटू रामसागर राय असे हल्ल्यात जखमी झालेल्या कामगाराचे नाव असून तो कळंबोली वसाहतीमधील सेक्टर १ परिसरात असलेल्या ए वन स्वीट मार्ट या दुकानात कामाला आहे. याच ठिकाणी आरोपी संतोष पासवान याचे खाद्यपदार्थ विक्रीचे दुकान आहे. छोटू राय हे काही दिवसापूर्वी पासवान यांच्याकडे कामाला होते. पासवान यांनी त्यांच्या पगाराचे पैसे बाकी ठेवले होते. ते पैसे मागणीसाठी छोटू पासवान यांच्याकडे गेला असता, पासवान याने छोटुवर चोरीचा आरोप करत शिवीगाळ आणि मारहाण करण्यास सुरवात केली. यावेळी तिथे हजर असलेले दुकान मालक हसुराम चौधरी यांनी देखील पासवान याला साथ देत छोटूला शिवीगाळ व मारहाण करण्यास सुरवात केली. त्यावेळी झालेल्या झाटापटीत पासवान याने मारहाणीसाठी अज्ञात हत्याराचा वापर केल्याने छोटू याच्या डोक्यात आणि पोटात गंभीर दुखापत झाली आहे. छोटू यांनी केलेल्या तक्रारी नुसार कळंबोली पोलीस ठाण्यात आरोपी विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सद्यस्थितीत दोन्ही आरोपी कळंबोली पोलिसांच्या ताब्यात आहेत.

## वाहतुकीस अडथळा करणाऱ्या सरबत विक्री गाडीवर कारवाई

**दै.रायगड नगरी । पनवेल**

खारघर सेक्टर २७ मधील रांजनपाडा ते पापडीचा पाडाकडे जाणाऱ्या रोडवर टेम्पोमध्ये सरबत विक्री करणाऱ्या उमरमिया पडेले विरोधात पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. रोडवर वाहतुकीला अडथळा निर्माण करत टेम्पो उभा करून व्यवसाय केल्याप्रकरणी त्याच्यावर कारवाई केली असून परिसरातील फेरीवाले व वाहतुकीस अडथळा निर्माण करणाऱ्यांविरोधात नियमित कारवाई केली जात असल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले आहे.


## ग्रामपंचायत कोळखे

ता.पनवेल, जि.रायगड

### जाहीर निविदा

दि. ०१/१२/२०२२

प्रति,

अधिकृत / अनुभवी ठेकेदार,

यांस कळविण्यात येते की, ग्रामपंचायत कोळखे हद्दीतील खालील विकासकामे व खरेदी करावयाची आहेत. त्याकरिता ग्रामंपचायत हद्दीतील अधिकृत/अनुभवी ठेकेदारांकडून सिलबंद निविदा मागविण्यात येत आहे. सदर कामांच्या कोऱ्या निविदा मिळण्याकरिता अर्जाची तारीख दि. ०२/१२/२०२२ ते ०९/१२/२०२२ पर्यंत या दिवशी कार्यालयीन वेळेत ग्रामपंचायत कार्यालयात मिळतील.

सदर निविदा दि. ०९/१२/२०२२ रोजी दुपारी २ वाजेपर्यंत स्वीकारल्या जातील. सदर निविदा त्याच दिवशी कार्यालयीन वेळेत ३ वाजेपर्यंत उघडण्यात येतील. कामांकरिता लागणारी इसारा रक्कम ग्रामपंचायत कोळखे यांच्या नावाने डिमांड ड्राफ्टच्या द्वारे / रोखीने स्वीकारण्यात येतील. कोणतीही एक निविदा मंजूर करणे अगर नाकारण्याचा अधिकार ग्रामपंचायतीने राखून ठेवला आहे. इसारा रक्कम अंतिम देयकातून कापून घेतली जाईल.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रक रक्कम | इसारा रक्कम १% | कालावधी |
|---|---|---|---|---|
| १ | मानसी पार्क येथील साई मंदिर परिसरात पेव्हर ब्लॉक बसविणे | ३१६५५२/- | ३१६५ | ३ महिने |

| अ.क्र. | कामाचे नाव | नग |
|---|---|---|
| १ | ग्रामपंचायत कोळखे हद्दीतील कोळखे, कोळखे पेठ व पारपुंड या तिन्ही गावात सीसीटीव्ही कॅमेरे बसविणे | ३० |

**अटी व शर्ती :-**

१) सर्वांत कमी दराचे अथवा कोणतेही टेंडर मंजूर अगर नामंजूर करण्याचा अधिकार ग्रामपंचायतीने राखून ठेवला आहे त्याची कारणे दिली जाणार नाहीत.

२) सदर काम पंचायत समितीकडील बांधकाम विभाग तांत्रिक अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली करणेचे आहे त्याचे मूल्यांकनाप्रमाणे बील अदा करण्यात येईल.

३) काम ज्यांच्या नावे मंजूर होईल त्यांनी नियमा प्रमाणे रूपये १०० स्टॅम्प पेपरवर बॉण्ड करून देणे.

४) कामाचे एस्टीमेंट ऑफिस वेळेत पहावयास मिळेल.

५) दिलेल्या मुदतीत काम पूर्ण न झाल्यास बिल अदा करणे अगर न करणे याचा अधिकार ग्रामपंचायतीस राहील.

**सही/-**
**ग्रामसेवक**
**ग्रामपंचायत कोळखे**

**सही/-**
**सरपंच**
**ग्रामपंचायत कोळखे**